शनिवार, २१ मे २०२२
◆ वर्ष १४ ◆ अंक ३०३
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## ओला, उबेर कंपन्यांना केंद्राची नोटीस




**नवी दिल्ली :** खासगी टॅक्सीसेवा देणाऱ्या ओला आणि उबर कंपन्यांना वाढत्या तक्रारींबाबत केंद्र सरकारने नोटीस दिली आहे तसेच १५ दिवसांत उत्तर देण्यास सांगण्यात आले आहे. केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाने (सीसीपीए) अनुचित व्यापार पद्धती आणि ग्राहक हक्कांचे उल्लंघन केल्याबद्दल ही नोटीस बजावली आहे. नॅशनल कंझ्युमर हेल्पलाइनच्या (एनसीएच) आकडेवारीनुसार १ एप्रिल २०२१ ते १ मे २०२२पर्यंत देशभरातील ग्राहकांकडून ओलाविरुद्ध २,४८२ तक्रारी दाखल करण्यात आल्या होत्या. त्याचवेळी उबेरविरोधात ७७० तक्रारी दाखल झाल्या. ओलाच्या बाबतीत ५४ टक्के तक्रारी सेवेतील कमतरतेशी संबंधित होत्या, तर उबेरच्या बाबतीत हा आकडा ६४ टक्के होता. याबाबत दोन्ही कंपन्यांना १५ दिवसांत उत्तर द्यावयाचे आहे.

### अंतरंग
कोपरा खाडीत अवैध रेतीउपसा करणाऱ्यांवर कारवाई/३
खालापुरात काही शिवभोजन केंद्र नामधारी/७
कराटे स्पर्धेत नवी मुंबईतील खेळाडू चमकले /८

### प्रकल्पग्रस्तांच्या एकजुटीचा आणखी एक विजय!

# भूसंपादनाच्या सर्वेक्षणाला स्थगिती

## २४ जूनच्या आंदोलनाची जोरदार तयारी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कामासाठी जमीन संपादित करण्याच्या नोटिसा पारगाव, कुंडेवहाळ आणि ओवळे या गावांना सिडकोकडून देण्यात आल्या होत्या आणि त्या अनुषंगाने शुक्रवारी (दि. २०) पारगाव येथे सर्वेक्षण करण्यात येणार होते, पण त्यास प्रकल्पग्रस्त आणि लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समिती, २७ गाव समितीने प्रखर विरोध केल्याने सिडको आणि मेट्रो सेंटरने नमते घेत सर्वेक्षणाला येणे टाळले असून सद्यस्थितीत सर्वेक्षण व मोजणीला तात्पुरती स्थगिती दिली आहे. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांच्या एकजुटीचा आणखी एक विजय झाला आहे.

सिडकोने प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न न सोडविता सर्वेक्षण व मोजणी करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. तो प्रयत्न शुक्रवारी पारगाव येथे हाणून पाडण्यात आला. या वेळी लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीचे कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष के. ए. म्हात्रे, राजेश गायकर, २७ गाव समितीचे प्रवक्ते रूपेश धुमाळ, प्रेम पाटील, प्रवीण पाटील, बाळाराम नाईक, संपर्क प्रमुख किरण पवार, नगरसेवक विजय चिपळेकर, कार्याध्यक्ष सुनील म्हात्रे, सदस्य राकेश गायकवाड, माजी सरपंच महेंद्र पाटील, कवी तारेकर, प्रल्हाद नाईक, राहुल नाईक, सुशील तारेकर, माजी उपसरपंच निशा पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



सिडकोने पुन्हा पनवेल तालुक्यातील पारगाव, कुंडेवहाळ, ओवळे या गावांमधील जमीन नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कामाकरिता संपादित करण्यात येणार असल्याच्या नोटिसा प्रकल्पग्रस्तांना दिल्या आहेत. प्रकल्पग्रस्तांचे अनेक प्रश्न प्रलंबित असताना सिडको मात्र पुन्हा एकदा प्रकल्पग्रस्तांची फसवणूक करीत आहे. सिडको विकसकांसाठी रेड कार्पेट, तर प्रकल्पग्रस्तांकडे वारंवार दुर्लक्ष करीत आहे. जमिनीचा सर्व्हे २० मे रोजी पारगाव व २३ तारखेला कुंडेवहाळ येथे होणार होता. **(पान २ वर..)**

### संयुक्त बैठक बोलाविण्याची मागणी

प्रकल्पग्रस्तांनी सिडकोकडे २५ फेब्रुवारी २०२१ व ११ ऑक्टोबर २०२१ या दिवशी हरकतीचे मुद्दे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर १ पनवेल यांना सादर केलेले आहेत, पण आजच्या तारखेपर्यंत या बाबतीत कोणतेही स्पष्टीकरण अथवा खुलासा प्रकल्पग्रस्तांना मिळाला नाही. संबंधित जमीन नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाकरिता व तद्नुषंगिक विकासकामासाठी संपादन होत असल्याचे मोघम स्वरूपात म्हटले आहे. त्या प्रकल्पग्रस्तांना विस्थापन व पुनर्वसनाचे कुठले लाभ देण्यात येतील व कधी देण्यात येतील याबाबत काही निर्णय व धोरण ठरलेले नाही तसेच कुठल्या कायद्याने भूसंपादन करणार किंवा सहमतीने भूसंपादन करणार का याचीही माहिती प्रकल्पग्रस्तांना देण्यात आलेली नाही. त्यामुळे आज आयोजित केलेली संयुक्त मोजणी जोरजबरदस्तीने व एकतर्फी असल्याने त्याला सर्वपक्षीय समिती आणि प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांनी तीव्र विरोध केला. योग्य तो निर्णय घेण्यासाठी व प्रकल्पग्रस्तांनी उपस्थित केलेल्या हरकती व त्यांचे पुनर्वसन याच्यावर चर्चा करण्यासाठी सिडको प्रशासनाचे सक्षम व संबंधित अधिकारी उपजिल्हाधिकारी भूसंपादन, समिती व प्रकल्पग्रस्तांसोबत बैठक बोलविण्यात यावी तसेच या बैठकीपूर्वी अशा प्रकारच्या कुठल्याही संयुक्त मोजणी व सर्वेक्षणास कायम विरोध राहील, असे समिती आणि प्रकल्पग्रस्तांनी या वेळी स्पष्ट केले.

# पनवेल परिसरातील नागरिकांना मिळणार विविध सोयीसुविधा

## स्थायी समितीच्या सभेत ३२ विषयांना मंजुरी

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका स्थायी समितीच्या शुक्रवारी (दि. २०) झालेल्या सभेत एकूण ३४पैकी ३२ विषयांना मंजुरी देण्यात आली. त्यामुळे नागरिकांना येत्या काळात विविध सोयी-सुविधा उपलब्ध होणार आहेत. सभेत एक विषय नामंजूर करण्यात आला, तर एका विषयाला स्थगिती देण्यात आली आहे.

पनवेल महापालिकेच्या स्थायी समितीची सभा सभापती नरेश ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आयुक्त दालनाशेजारील बैठक सभागृहात घेण्यात आली. या सभेस सभागृह नेते परेश ठाकूर, स्थायी समिती सदस्य, उपायुक्त सचिन पवार, कैलास गावडे, मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखापरीक्षक निलेश नलावडे, लेखाधिकारी डॉ. संग्राम व्होरकाटे, लेखापरीक्षक विनयकुमार पाटील, सचिव तिलकराज खापर्डे, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

या वेळी मागील स्थगित विषय महापालिका क्षेत्रातील (पनवेल शहर वगळता) पाणीपुरवठा परिचालनासाठी व देखभाल-दुरुस्तीकरिता मुनष्यबळ पुरविण्याच्या कामासाठी सुधारित वाढीव खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळणे, पनवेल शहर येथील जलशुद्धीकरण केंद्र व उच्चस्तरीय जलकुंभ तसेच देहरंग धरण व वितरण नेटवर्क परिचालनासाठी मनुष्यबळ पुरविण्याच्या कामाकरिता वाढीव खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळणे, महापालिका क्षेत्रात पिण्याच्या पाण्याचे टँकर भाड्याने पुरविण्याच्या कामाकरिता वाढीव खर्चास सुधारित प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळणे या विषयांना स्थायी समितीने मंजुरी दिली.

महापालिका क्षेत्रातील जलशुद्धीकरण केंद्रावर ३२० केव्हीए क्षमतेचा डिझेल जनरेटर बसविणे, पुरविणे आणि कार्यान्वित करण्याबाबतच्या विषयास स्थायी समितीने मंजुरी दिली.

महापालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामावर-अतिक्रमणांवर सनियंत्रण ठेवण्यासाठी व आळा घालण्यासाठी मनपा कार्यक्षेत्रामध्ये ०.५ मी. रिझॉल्यूशन असलेली उपग्रह छायाचित्राच्या आधारे सविस्तर बेस मॅप तयार करण्याच्या कामास मे. वसुंधरा जिओ टेक्नॉलॉजी प्रा.लि यांना मुदतवाढ मिळण्याबाबतच्या विषयास मंजुरी देण्यात आली. **(पान २ वर..)**



### निवडक

#### नवज्योतसिंग सिद्धू यांची पटियाला कोर्टात शरणागती

**पटियाला :** ३४ वर्षे जुन्या रोड रेजप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने एक वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा सुनावलेले पंजाब काँग्रेसचे नेते नवज्योतसिंग सिद्धू यांनी शुक्रवारी (दि. २०) पटियाला जिल्हा न्यायालयात आत्मसमर्पण केले. त्यानंतर त्यांना न्यायालयीन कोठडीत घेण्यात आले असून पुढील प्रक्रिया सुरू आहे.

#### ज्ञानवापी मशीद प्रकरण जिल्हा कोर्टाकडे वर्ग

**नवी दिल्ली :** ज्ञानवापी मशिदीत शिवलिंग सापडल्याचा दावा सर्वेक्षण आयोगाने केला आहे. यावर शुक्रवारी (दि. २०) सर्वोच्च न्यायालयात सुनावणी घेण्यात आली. या वेळी सुप्रीम कोर्टाने हे प्रकरण जिल्हा न्यायालयाकडे वर्ग करण्याचे आदेश दिले आहे तसेच यापूर्वी दिलेला आदेश कायम राहील, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

# पुढील २५ वर्षांच्या दृष्टीने काम करा

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचे भाजप पदाधिकाऱ्यांना आवाहन

**नवी दिल्ली, जयपूर : वृत्तसंस्था**

जयपूरमध्ये आयोजित भाजपच्या देशभरातील पदाधिकाऱ्यांच्या बैठकीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून संबोधित केले. या वेळी त्यांनी पक्ष पदाधिकाऱ्यांना पुढील २५ वर्षांच्या दृष्टीने पावले उचलण्याचे निर्देश दिले आहेत.




केंद्रात एनडीए अर्थात भाजपप्रणीत आघाडीचे सरकार येण्याला आठ वर्षे पूर्ण होत आहेत. या पार्श्वभूमीवर भाजप पदाधिकाऱ्यांशी संवाद साधताना पंतप्रधान मोदी म्हणाले, या महिन्यात भाजपला केंद्रात आठ वर्षे पूर्ण होत आहेत. ही वर्षे देशाची सेवा करण्याची होती. गरीबांच्या आणि मध्यम वर्गाच्या कल्याणासाठी, महिलांच्या सबलीकरणासाठी काम करण्याची होती. जनसंघाच्या काळात आपले निवडणूक राजकारणात अस्तित्व अल्प होते, परंतु तरीही आपल्या कार्यकर्त्यांनी राष्ट्रउभारणीच्या कामात झोकून देऊन काम केले. आपण आता पुढील २५ वर्षांसाठीचे उद्दिष्ट निश्चित करीत आहोत. हे ध्येय सर्व अडचणींवर मात करीत सातत्याने देशाच्या नागरिकांसाठी काम करीत राहणे आणि त्यांच्या आकांक्षांची पूर्तता करणे यासाठी असायला हवे.

या वेळी पंतप्रधान मोदींनी विरोधी पक्षांवर नाव न घेता निशाणा साधला. आपण पाहातोय की, मूळ मुद्द्यावरून लोकांचे दुसरीकडे लक्ष भरकटवणे हे काही पक्षांचे काम होऊन बसले आहे, पण आपण त्यांच्या जाळ्यात न अडकता सावध राहायला हवे, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

### चंद्रपुरात अपघातानंतर आगीचा भडका; नऊ जणांचा होरपळून मृत्यू

**चंद्रपूर : प्रतिनिधी**

चंद्रपूर-मूल मार्गावर अजयपूर येथे गुरुवारी (दि. १९) रात्री टँकर आणि ट्रकमध्ये झालेल्या अपघातात नऊ जणांचा मृत्यू झाला. अपघातानंतर आग लागल्याने यात होरपळून मृत पावलेल्या प्रवाशांचे मृतदेह जळून खाक झाले आहेत.

वडसावरून चंद्रपूरला लाकूड घेऊन येणारा ट्रक आणि चंद्रपूरवरून मूलकडे जाणारा डिझेल टँकर या दोन वाहनांची गुरुवारी रात्री १०.३०च्या सुमारास समोरासमोर धडक झाल्याने ट्रकला आग लागली. आगीने भीषण रूप धारण केल्याने ट्रकमध्ये असलेले सात जण होरपळून मृत्युमुखी पडले. हे सर्व मजूर लाकूड उतरविण्यासाठी चंद्रपूरला येत होते, तर टँकरचालक आणि क्लिनरही होरपळून मृत पावले.

# राज ठाकरेंचा अयोध्या दौरा तूर्त स्थगित

**मुंबई : प्रतिनिधी**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचा अयोध्या दौरा तूर्त स्थगित झाला आहे. खुद्द राज यांनीच ट्विटरवरून याबाबत माहिती दिली. तब्बेत ठीक नसल्याने राज यांचा दौरा रद्द झाल्याचे सुत्रांकडून सांगण्यात येत आहे. दरम्यान, पुण्यातील सभेमध्ये आपण यावर सविस्तर बोलणार असल्याचे राज यांनी स्पष्ट केले आहे.



राज यांनी 'तूर्तास अयोध्या दौरा स्थगित' असे वाक्य असणारी पोस्ट ट्विटरवरून जारी केलीय. पुढे 'महाराष्ट्र सैनिकांनो, या! यावर सविस्तर बोलूच रविवारी दिनांक २२ मे रोजी सकाळी १० वाजता गणेश कला क्रीडा केंद्र, पुणे' येथे असेही या पोस्टमध्ये नमूद केले आहे.

काही दिवसांपूर्वी राज अचानक पुणे दौरा अर्धवट सोडून मुंबईत परत आले होते. हा दौरा अर्धवट सोडून परत येण्यामागे राज यांना पायाला झालेल्या दुखापतीच्या दुखण्याने पुन्हा डोके वर काढल्याचे कारण असल्याचे सांगितले जात आहे. एक ते दीड वर्षापूर्वी राज यांच्या पायाला दुखापत झाली होती. या दुखापतीसंदर्भात मध्यंतरी त्यांनी उपचार घेतले होते, मात्र आता हा त्रास त्यांना पुन्हा सुरू झाला आहे.

पुण्यातील सभेनंतर राज डॉक्टरांचा पुन्हा सल्ला घेणार आहेत. सल्ल्यानुसार दौऱ्यासंदर्भातील पुढील तारीख आणि धोरण निश्चित केले जाईल. राज यांच्या पायासंदर्भातील समस्येवर उपचार म्हणून शस्त्रक्रिया करण्याची पुन्हा गरज लागू शकते, असा डॉक्टरांचा प्राथमिक अंदाज असल्याचेही सांगितले जात आहे.

# आयपीएल फायनलआधी रंगणार समारोप सोहळा

## दिग्गज बॉलीवूड सेलिब्रिटी होणार सहभागी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

यंदाचे आयपीएल पर्व शेवटच्या टप्प्यात आहे. या हंगामातील अवघे काही सामने शिल्लक राहिले असून लवकरच प्लेऑफचे चार सामने खेळवले जाणार आहेत. त्यापूर्वी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) अंतिम सामन्याची वेळ बदलली आहे. अंतिम सामना सायंकाळी ७.३० ऐवजी ८ वाजता खेळवला जाणार आहे. समारोप सोहळा आयोजित केला जाणार असल्यामुळे हा निर्णय घेण्यात आल्याचे म्हटले जात आहे. दरम्यान, या समारोप सोहळ्याला बॉलीवूडमधील दिग्गज कलाकार हजेरी लावणार असून मनोरंजन करणार आहेत.

बीसीसीआय तसेच आयपीएल गव्हर्निंग समितीने समारोप सोहळा आयोजित करण्याचे ठरवले आहे. हा सोहळा अंतिम सामना सुरू होण्याआधी होईल. 'क्रिकबझ'ने दिलेल्या माहितीनुसार हा कार्यक्रम एकूण ५० मिनिटांचा असून या कार्यक्रमाला २९ मे रोजी सायंकाळी ६.३० वाजता सुरुवात होणार आहे. या वेळी बॉलीवूडमधील अनेक कलाकार हजेरी लावणार असून ते मनोरंजनपर कार्यक्रम सादर करतील. म्हणजेच आयपीएलचा अंतिम सामना सुरू होण्याआधी प्रेक्षकांना ग्लॅमरचा तडका अनुभवायला मिळणार आहे. या कार्यक्रमात कोणकोणते कलाकार येतील याबाबत निश्चित माहिती मिळालेली नाही.



**क्वालिफायर-१ : २४ मे २०२२**
संध्याकाळी ७.३० वाजता
(ईडन गार्डन्स, कोलकाता )

**एलिमिनेटर : २५ मे २०२२**
संध्याकाळी ७.३० वाजता
(ईडन गार्डन्स, कोलकाता)

**क्वालिफायर-२ : २७ मे २०२२**
संध्याकाळी ७.३० वाजता
(नरेंद्र मोदी स्टेडियम, अहमदाबाद)

**अंतिम लढत २९ मे २०२२,**
रात्री ८ वाजता (नरेंद्र मोदी स्टेडियम, अहमदाबाद)

याआधी आयपीएलच्या प्रत्येक हंगामात उद्घाटन आणि समारोप सोहळ्याला बॉलीवूडमधील दिग्गज कलाकार प्रेक्षकांचे मनोरंजन करीत असत, मात्र २०१९ साली पुलवामा हल्ल्यामुळे हे कार्यक्रम घेण्यात आले नव्हते तसेच २०२० आणि २०२१च्या हंगामात कोरोना महामारीमुळे हे कार्यक्रम आयोजित करण्यात आले नव्हते, परंतु यंदा समारोपाचा मोठा कार्यक्रम होणार असल्याचे म्हटले जात आहे.

दरम्यान, आयपीएलच्या शेवटच्या टप्प्यात प्लेऑफमधील चार सामने कोलकाता आणि अहमदाबाद येथील स्टेडियमवर खेळवले जाणार आहेत. कोलकाता येथील इडन गार्डन या स्टेडियमवर क्वॉलिफायर १ आणि एलिमिनेटर सामना खेळवला जाईल, तर क्वॉलिफायर २ आणि अंतिम सामना अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळवला जाणार आहे.

# 'मोक्का' लागलेल्या तरुणाचा मित्राकडून खून

## अनैतिक संबंधाचा संशय; दोन आरोपी अटकेत

**कर्जत : बातमीदार**

कर्जत तालुक्यातील खाड्याचा पाडा येथील गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या एका तरुणाचा त्याच्याच मित्राने दुसऱ्या एकाला सोबत घेऊन खून केल्याची घटना गुरुवारी (दि. १९) रात्री घडली. अनैतिक संबंधातून ही घटना घडल्याचा पोलिसांना संशय असून पोलिसांनी दोन्ही तरुणांना अटक केली आहे.

नेरळ पोलीस ठाणे हद्दीतील खाड्याचापाडा येथील सुभाष रामू खाडे हा गुरुवारी रात्री उशिरा घरी परत आला नाही म्हणून त्याचा मोठा भाऊ गणेश खाडे त्याचा शोध घेण्यासाठी त्याच्या मित्राकडे पाषाणे कातकरी वाडी येथे पोहचला. त्या वेळी तेथे मोतीराम बबन वाघ आणि शंकर नथू वाळवी हे दोघे लोखंडी हत्याराने सुभाषला मारत होते.



कर्जत तालुक्यातील पाषाणे येथील घटना

गणेशला पाहून दोघेही पळून गेले. त्यानंतर गणेशने घटनेची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या सुभाषला रुग्णवाहिकेतून कर्जत उपजिल्हा रुग्णालयात आणले. तेथे डॉक्टरांनी सुभाषचा मृत्यू झाला असल्याचे जाहीर केले.

दरम्यान, पोलिसांनी गणेश खाडे याच्या तक्रारीनंतर मोतीराम बबन वाघ आणि शंकर नथू वळवी या दोघांना मध्यरात्री ताब्यात घेऊन सुभाष खाडेच्या खूनप्रकरणी अटक केली. या दोघांवर नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

मयत तरुण हा रायगड पोलिसांकडून तडीपार केलेला गुन्हेगार होता. त्याच्यावर मोक्का अर्थात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल आहे. तो व त्याचा खून करणारा मोतीराम वाघ हे एका गुन्ह्यात सामिल होते. मित्र असलेले हे दोघे एकमेकांच्या घरी जात असत. मयत सुभाषचे आपल्या पत्नीसोबत अनैतिक संबंध असल्याच्या संशयातून त्याला मोतीरामने कातकरी वाडीत बोलाविले आणि त्याला दारू पाजून मित्र शंकर वळवीच्या मदतीने लोखंडी हत्याराने जीवे मारले. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# संस्कार ठरवितात तुम्ही कोण बनणार?

## संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांचे प्रतिपादन





**पुणे : प्रतिनिधी**

कोट्याधीश घरात जन्माला आलेला एखादा लादेन बनतो, तर लहानपणी जगण्यासाठी पेपर टाकणारा एक मुलगा पुढे जाऊन ए. पी. जे. अब्दुल कलाम बनतात असे मत देशाचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी व्यक्त केले. अल कायदातही सुशिक्षित तरुण आहेत आणि इन्फोसिसमध्ये देखील सुशिक्षित तरुण आहेत. तुमच्यावरचे संस्कार तुम्ही कोण होणार हे ठरवतात, असेही राजनाथ सिंह यांनी नमूद केले.

डॉ. डी. वाय पाटील विद्यापीठाचा तेरावा पदवीप्रदान समारंभ राजनाथ सिंह यांच्या प्रमुख उपस्थितीत पिंपरी-चिंचवड येथे पार पडला. या वेळी ते बोलत होते. या समारंभात ज्येष्ठ उद्योगपती व फोर्स मोटर्सचे अध्यक्ष डॉ. अभय फिरोदियाही उपस्थित होते. राजनाथ सिंह म्हणाले, कोरोना आपत्तीनंतर आरोग्य क्षेत्राचे महत्त्व आणि या क्षेत्राबद्दलचा जगभरातील आदर वाढला आहे. आरोग्य, निरोगीपणा याला आपल्या संस्कृतीत प्राधान्य देण्यात आले आहे. शरीरासोबतच मनस्वास्थ्य देखील महत्त्वाचे आहे. पदवी घेतल्यानंतर तुम्ही देशात, जगात काम कराल तेव्हा तुमच्या मनाची व्यापकता ठरवेल की तुम्ही लोकांना काय देणार? असेही ते म्हणाले. कोरोना काळानंतर भारतीय वैद्यकीय क्षेत्राबद्दलचा आदर जगात वाढला. वैद्यकीय क्षेत्रावर कोणाची बळजोरी नव्हती, पण त्यांच्यावरच्या संस्कारांमुळे त्यांनी सामाजिक कार्यात वाहून घेतले असे राजनाथ सिंह यांनी सांगितले.

डॉ. अभय फिरोदिया म्हणाले, सन १९६० मध्ये महाराष्ट्र औद्योगिक क्षेत्रात आघाडीवर नव्हते. गेल्या ६० वर्षात महाराष्ट्राची जी काही प्रगती झाली ती सरकारचे देणे नसून येथील लोक,उद्योजकांच्या प्रयत्नांची देणे आहे. १९३१ मध्ये उत्तर प्रदेशचा जीडीपी देशात सर्वाधिक होता. १९६७ मध्ये बिहार राज्य गव्हर्नन्समध्ये देशात आघाडीवर होते. मग आता हे सगळे का बिघडले? 'मोदी राज'मध्ये हा प्रवाह बदलला जातो आहे. आता उत्तर प्रदेशातली कायदा सुव्यवस्था सुधारत आहे. बिहारही बदलतो आहे. उद्योग, रोजगार निर्मितीत ही राज्ये सुधारतील तेव्हा महाराष्ट्राला स्पर्धा करावी लागेल. देशाच्या औद्योगिक प्रगतीचा मी साक्षीदार आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्ससारखे नवी तंत्रज्ञान येत आहे. या दृष्टीने विद्यापीठांना तयार राहावे लागेल असेही फिरोदिया यांनी नमूद केले.

# बीडीडी चाळीच्या पुनर्वसनात पोलिसांना मोफत घरे द्या

## आमदार कालिदास कोळंबकर यांची मागणी




**मुंबई : प्रतिनिधी**

वरळीतील बीडीडी चाळीत अन्य शासकीय कर्मचाऱ्यांना ज्या पद्धतीने निवासस्थाने दिली त्याच पद्धतीने पोलिसांना मोफत निवासस्थाने द्या, अशी मागणी भाजपचे आमदार कालिदास कोळंबकर यांनी शुक्रवारी (दि.२०) पत्रकार परिषदेत केली. भाजपच्या प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत आ. कोळंबकर बोलत होते.

प्रदेश प्रवक्ते माजी आमदार अतुल शाह यावेळी उपस्थित होते. राज्य शासनाने बीडीडी चाळीत पोलिसांना मोफत घरे देण्याचा निर्णय तातडीने घेतला नाही तर आपण उपोषण करू असा इशाराही आमदार कोळंबकर यांनी या वेळी दिला. आमदार कोळंबकर पुढे म्हणाले, बीडीडी चाळीत राहणाऱ्या पोलिसांना घर घेण्यासाठी ५० लाख रु. मोजावे लागणार असल्याचे गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी जाहीर केले आहे. बीडीडी चाळीत सरकारने शासकीय कर्मचाऱ्यांना हक्काची घरे दिली. बीडीडी चाळीचे पुनर्वसन करताना अन्य शासकीय कर्मचाऱ्यांना जो न्याय लावला तोच न्याय पोलीस कर्मचाऱ्यांना लावला गेला पाहिजे. बीडीडी चाळीचे पुनर्वसन करताना पोलिसांना दुसरा न्याय लावण्याने पोलिसांवर अन्याय होईल.

पोलीस हे शासकीय सेवा बजावत असताना त्यांना वेगळा न्याय लावण्याचा गृहनिर्माण विभागाचा निर्णय चुकीचा आहे. माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलिसांना हक्काची घरे देण्याचा निर्णय घेतला होता. त्या निर्णयाप्रमाणे राज्य सरकारने पोलिसांना हक्काची घरे द्यावीत असेही आ. कोळंबकर यांनी नमूद केले.

# वादग्रस्त पोस्ट करणाऱ्या किरण इनामदारला कोर्टाचा दिलासा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्याविरोधात अभिनेत्री केतकी चितळे हिने वादग्रस्त फेसबुक पोस्ट केली होती. आणि तिची पोस्ट शेअर करणाऱ्या पनवेल येथील किरण इनामदार याचा शुक्रवारी न्यायालयाने जामिन मंजूर केलेला आहे. किरण इनामदार यास न्यायाल्याने २०,००० च्या जामिनावर सोडण्याचे आदेश दिले आहेत.

केतकी चितळेने शरद पवार यांच्याबद्दल बदनामीकारक फेसबुक पोस्ट केल्याने तिच्यावर दाखल झालेल्या गुन्ह्यांमध्ये तिला अजून जामीन मंजूर झालेला नाही. केतकी चितळेंची वादग्रस्त पोस्ट शेअर करणाऱ्या पनवेलमधील किरण इनामदार यास जामिन मंजूर झालेला आहे. हीच पोस्ट किरण इनामदार तरुणाने शेअर केली होती. या प्रकरणी किरण इनामदार याच्यावर पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्यानंतर शुक्रवारी (दि.१९) त्याला पनवेल न्यायालयात हजर करण्यात आले होते. त्यावेळी पोलिसांकडून पाच दिवसांच्या पोलीस कोठडीची मागणी करण्यात आली.

किरण इनामदार याने केलेली पोस्ट ही जरी निषेधार्थ आली तरी त्याचे विरुद्ध लावण्यात आलेले कलम लागू होत नाहीत. अशा प्रकारचे गुन्हे दाखल करणे म्हणजे अभी व्यक्ती स्वातंत्र्यावर घाला घालण्यासारखे आहे, अशी प्रतिक्रिया किरण इनामदार यांचे वकिल चेतन जाधव यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना दिली. तसेच सदरचा गुन्हा रद्द करण्यासाठी उच्च न्यायालयात दाददेखील मागणार असल्याचे त्यांनी सांगीतले.

# येरवडा कारागृहात कैद्यांमध्ये हाणामारी

**पुणे : प्रतिनिधी**

येरवडा कारागृहात पिण्याचे पाणी भरण्यावरून झालेल्या वादातून दोन कैद्यांना सिमेंटच्या पत्र्याने मारहाण करण्यात आली. या घटनेत दोन कैदी जखमी झाले असून मारहाण प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली.

टिकलसिंह गब्बरसिंह, अजिनाथ लक्ष्मण गायकवाड अशी अटक करण्यात आलेल्या कैद्यांची नावे आहेत. दोघांनी केलेल्या मारहाणीत कैदी सोनू शेटे, किशोर मंजुळे जखमी झाले आहेत. कारागृह अधिकारी अभिजीत यादव यांनी याबाबत येरवडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. येरवडा कारागृहातील सर्कल क्रमांक एक कार्यालयासमोर कैदी टिकलसिंह, अजिनाथ गायकवाड यांचा सोनू शेटे, किशोर मंजुळेशी वाद झाला. वादाचे पर्यवसान हाणामारीत झाले. दोघांनी सिमेंटच्या पत्र्याने शेटे आणि मंजुळेला मारहाण केली. शेटे आणि मंजुळेवर उपचार करण्यात आले असून पोलीस उपनिरीक्षक शेलार तपास करीत आहेत.

# महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोगाची कोकण विभागीय आढावा बैठक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत कोकण विभागात सन २०२१-२२ मध्ये ऑनलाईन पध्दतीने एक लाख ७९ हजार ५९१ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी एक लाख ४१ हजार २८५ अर्ज निकाली काढण्यात आले आहेत. निकाली काढलेल्या अर्जांपैकी १ लाख ३४ हजार ५१ अर्ज विहित मुदतीत सेवा देऊन निकाली काढण्यात आले आहेत. या अधिनियमांतर्गत सर्वाधिक अपिल ठाणे जिल्ह्यात दाखल झाले असून कोकण विभागात अव्वल कामगिरी झाली आहे, अशी आयोगाचे मुख्य आयुक्त दिलीप शिंदे यांनी दिली.

कोकण भवनात महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोगाची आढावा बैठक झाली. या बैठकीत कोकण विभागाचे राज्य लोकसेवा हक्क आयुक्त अभय यावलकर, उपायुक्त (प्रशासन) मनोज रानडे यांच्यासह कोकण विभागातील सर्व जिल्हाधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी प्रतिनिधी उपस्थित होते.

पारदर्शकता, उत्तरदायित्व, कालबध्द सेवा, कार्यक्षमसेवा, माहिती तंत्रज्ञानाचा वापर व ई-प्रशासनाचा अवलंब ही महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ या कायद्याची मुख्य उद्दिष्टे आहेत. या कायद्यांतर्गत ५०६ सेवा अधिसूचित करण्यात आल्या आहेत. ज्या नागरिकांना आरटीएस महाराष्ट्र मोबाईल प किंवा आपले सरकार आरटीएस पोर्टलचा वापर करणे शक्य नाही, अशा नागरीकांसाठी कोकण विभागात एकूण तीन हजार २३८ आपले सरकार सेवा केंद्र व ४२ आपले सरकार सेतु सेवा केंद्र कार्यरत आहेत. शहरी भागात एक हजार ६४८ व ग्रामीण भागातील ग्रामपंचायत स्तरावर १ हजार ५४८ आपले सरकार सेवा केंद्रे कार्यरत आहेत. या वेळी उपस्थितांना सादरीकरणाव्दारे माहिती देण्यात आली. अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष काम करताना येणाऱ्या अडचणींची चर्चा करण्यात आली. शिंदे यांनी प्रश्नांची उत्तरे दिली.

# बेस्ट, सफाई कर्मचाऱ्यांचा भविष्य निर्वाह निधी हडपण्याचा डाव

## भाजपचे आमदार योगेश सागर यांचा आरोप

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील सार्वजानिक वाहतूक सेवा कर्मचारी व सफाई कर्मचाऱ्यांच्या कष्टाची कमाई मुंबई महापालिका प्रशासनातील काही अधिकारी व कंत्राटदार लुटण्याचे काम करत असल्याचा आरोप भाजपाचे आमदार योगेश सागर यांनी केला आहे. तसेच महानगरपालिका प्रशासन हे कामगारांच्या आयुष्याशी व त्यांच्या भविष्याशी खेळ करत असून खासगी कंत्राटदारांना हाताशी धरुन पालिका प्रशासन बेस्ट कर्मचाऱ्यांचा थेट भविष्य निवाह निधी हडप करत असल्याचेही योगेश यांचे म्हणणे आहे. योगेश यांनी यासंदर्भात केंद्रीय श्रम आणि रोजगार मंत्री भूपेंद्र यादव यांच्याकडे तक्रार करत पत्र दिले आहे.

कंत्राटी सफाई कर्मचाऱ्यांचा भविष्य निर्वाह निधीत तब्बल १९० कोटी रुपयाचा घोटाळा झाला आहे. तर बेस्ट कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीचा जवळपास साडेसहा कोटी रुपयांचा घोटाळा झाला आहे. विशेष म्हणजे यावर मुंबई महापालिकेचे आयुक्त गंभीर नाही. तसेच राज्य सरकार याबाबत गांभीर्याने विचार करीत नाही. या मुळे या गोटाळ्याकडे लक्ष वेधत आपण याची दखल घेत चौकशी करावी, अशी मागणी सादर केलेल्या पत्राद्वारे केली आहे

# पुण्याचे 'मेट्रोमॅन' शशिकांत लिमये यांचे निधन

**पुणे : प्रतिनिधी**




मेट्रो प्रकल्पासाठी आग्रही भूमिका मांडणारे आणि पुणे, पिंपरी चिंचवडमधील मेट्रो प्रकल्पाचे सल्लागार शशिकांत लिमये (वय ७१) यांचे गुरुवारी रात्री निधन झाले. भारतीय रेल्वेतील तज्ज्ञ अधिकारी म्हणूनही त्यांची ख्याती होती. त्यांच्यामागे पत्नी, दोन मुली आणि भाऊ असा परिवार आहे.

लिमये यांना गुरुवारी रात्री आठच्या सुमारास घरी हृदयविकाराचा झटका आला. त्यांना तातडीने खासगी रुग्णालयात नेण्यात आले, परंतु उपचारापूर्वीच त्यांचे निधन झाले. मेट्रो प्रकल्पाच्या विस्तारीकरणाबाबत दोन दिवसांपूर्वी महामेट्रोने घेतलेल्या बैठकीतही त्यांनी सक्रीय सहभाग घेतला होता.

लिमये यांचे शिक्षण पुण्यातील न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग, फर्ग्युसन महाविद्यालय आणि शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय येथे झाले. त्यानंतर मुंबई आयआयटीमधून त्यांनी अभियांत्रिकीची पदवी घेतली. स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून ते भारतीय रेल्वेत दाखल झाले. रेल्वेत विविध ठिकाणी जबाबदारी पार पाडल्यानंतर विभागीय व्यवस्थापक या पदावरून निवृत्त झाले. निवृत्तीनंतरही ते सक्रीय होते. तीन खासगी कंपन्यांचे सल्लागार म्हणून त्यांनी काम पाहिले.

# ॲड. देवेंद्र यादव यांचे निधन



**मुंबई :** मुंबई मराठी पत्रकार संघाचे मानद विधी सल्लागार ॲड. देवेंद्र यादव यांचे शुक्रवारी (दि. २०) पहाटे २.३० वा. हृदयविकाराने निधन झाले. ते ६१ वर्षांचे होते. ॲड. देवेंद्र यादव यांच्या पश्चात पत्नी, दोन कन्या, मुलगा असा परिवार आहे. विशेष म्हणजे त्यांच्या दोन्ही कन्या वकील आहेत. ॲड. यादव यांच्या अकाली निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील साठरे बांबर पो.पाली गावी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

पान १ वरून

# भूसंपादनाच्या सर्वेक्षणाला स्थगिती

विविध समस्यांबाबत ग्रामस्थ अनेक वर्षांपासून पाठपुरावा करीत आहेत तसेच विमानतळाच्या भरावामुळे गावे पाण्याखाली बुडत आहेत. त्याकडे सिडको जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. सिडकोने आधी या सर्व प्रलंबित समस्या सोडवाव्यात आणि त्यानंतरच भूसंपादनाचा विषय काढावा, अशी ठाम भूमिका घेण्यात आली आहे.

उपजिल्हाधिकारी अधिकारी (भूसंपादन) यांनी एका नोटीसद्वारे पारगाव व परिसरातील गावांतील काही प्रकल्पग्रस्तांच्या जमिनीचे संपादन नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी व तद्नुषंगिक विकास कामाकरिता करण्यास मोजणी करण्याचे ठरवले होते. वास्तविक १५ मार्च २०२२ रोजी सिडकोच्या मुंबई कार्यालयातील बैठकीमध्ये सर्व प्रश्नांबाबत एक स्वतंत्र बैठक लावण्याची मागणी केली गेली होती व ती मान्यदेखील झाली होती, पण गेल्या दोन महिन्यांमध्ये त्या विषयाबाबत सिडको प्रशासनातर्फे एकही बैठक आयोजित करण्यात आली नाही. विशेष म्हणजे याकामी ग्रामस्थांशी बैठक तसेच चर्चा न करता हुकूम लादण्याचा प्रयत्न केला. त्या अनुषंगाने ग्रामस्थ व प्रकल्पग्रस्तांनी लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीकडे आपला प्रश्न मांडला. त्या वेळी जोपर्यंत प्रकल्पग्रस्तांचे सर्व प्रश्न मार्गी लागत नाही तोपर्यंत सर्वेक्षणाला विरोध राहील, अशी ठाम भूमिका मांडण्यात आली. त्यानुसार शुक्रवारी पारगाव येथे लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समिती, स्थानिक समिती, प्रकल्पग्रस्त, ग्रामस्थ मोठ्या संख्येने पारगाव येथे एकत्रित जमले होते. त्यामुळे सिडको आणि मेट्रो सेंटरचे अधिकारी या विरोधाला घाबरून सर्वेक्षणाला आलेच नाहीत तसेच संबंधित प्रशासनाने सर्वेक्षण करीत नसल्याचे सांगून नमते घेतले. जोपर्यंत प्रकल्पग्रस्तांचे सर्व प्रश्न मार्गी लागत नाहीत तोपर्यंत सिडकोने सर्वेक्षणाचा विचार करू नये, असा इशारा या वेळी देण्यात आला आहे.

याचबरोबर २४ जूनचे आंदोलन हे पुनश्च एकदा नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्यासाठी सरकारला इशारा देणारे असणार आहे. यात एक लाखाहून अधिक भूमिपुत्र एकजूट दाखवणार आहेत. नामकरण व भूमिपुत्रांच्या प्रलंबित मागण्यांबाबत आणि भावी पिढीच्या अस्मितेसाठी सर्वांनी एकसंघ होऊन पुढील महिन्यात २४ तारखेच्या आंदोलनात जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी उपस्थितांना केले.

# पनवेल परिसरातील नागरिकांना मिळणार विविध सोयीसुविधा

महापालिकेच्या मालकीच्या मलनि:स्सारण वाहिन्या व भूमिगत गटारांची दोन वर्षांसाठी दुरुस्ती, सुधारणा व नुतनीकरण करणे तसेच प्रभाग समिती अ प्रभाग क्र.४मधील मुर्बी गावात मलनि:स्सारण वाहिन्या अंथरणे व पावसाळी गटारांचे बांधकाम करणे याकामी न्यूनत्तम दराची निविदा स्थायी समितीने मंजूर केली.

महापालिकेमध्ये विवक्षित कामकाजास्तव नेमणूक केलेल्या सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या सेवामुदतवाढीस मंजुरीबाबतच्या विषयास मंजुरी देण्यात आली.महापालिकेच्या मालकीचे कार्यालय, शाळा, फिश मार्केट, उद्याने, शॉपिंग कॉम्प्लेक्स, नाट्यगृह, डॉ. आंबेडकर भवन, प्राथमिक आरोग्य केंद्रे, रुग्णालये व शौचालये इत्यादी ठिकाणच्या विद्युत व्यवस्थेची दोन वर्षांसाठी निगा देखभाल-दुरुस्ती, सुधारणा व नुतनीकरण करणेकामी न्यूनतम दराची निविदा मंजूर करण्याबाबतच्या विषयास स्थायी समितीने मंजुरी दिली.

महापालिकेच्या मालकीच्या महात्मा गांधी उद्यानातील पूर्वीची जुनी आरोग्य विभागाची हजेरी निष्काषित करणे, महापालिका क्षेत्रामध्ये दोन वर्षांकरिता पिण्याच्या पाण्याचे टँकर पुरविण्याकामी न्यूनतम दराच्या देकारास मान्यता देणेबाबतच्या विषयास मंजुरी देण्यात आली.

खारघर सेक्टर १५ येथील प्लॉट क्र. २५वर उद्यान विकसित करणे, अंतर्गत विरंगुळा केंद्र बांधकाम करणे, नवीन पनवेल पूर्व सेक्टर ४ ,१५ ए, ३, ५ येथील उद्याने नुतनीकरण करण्याच्या विषयास स्थायी समितीने मंजुरी दिली. महापालिकेमध्ये 'जीआयएस बेसड् वर्क्स् मॅनेजमेंट इंटिग्रेटेड विथ डबल एण्ट्री अकाउंटींग सिस्टम' तीन वर्षांकरिता देखभाल-दुरुस्तीसह प्रस्थापित व कार्यान्वित करण्याकामी न्यूनतम दराच्या निविदेस मान्यता देण्याबाबतच्या विषयास मंजुरी देण्यात आली.

महापालिका हद्दीतील खारघर येथील सेक्टर २० व सेक्टर ५मधील उद्याने, कळंबोली येथील सेक्टर १२मधील उद्याने नुतनीकरण करण्याच्या विषयास स्थायी समितीने मंजुरी दिली. प्रभाग समिती अ, प्रभाग क्र. ३ तळोजा पाचनंद येथील तलावाचा विकास व सुशोभीकरण करण्याच्या विषयास स्थायी समितीने मंजुरी दिली.

महापालिका क्षेत्रातील प्रभाग समिती अ, प्र. क्र. १मधील पिसार्वे, तुर्भे, घोट गावातील रस्त्यांचे काँक्रिटीकरण व गटार बनविणेकामी स्थायी समितीने मान्यता दिली.

महापालिका क्षेत्रातील प्रभाग समिती अ, प्र. क्र. १मधील धरणा कॅम्प गावातील अंतर्गत गटार बांधणे, नागझरी, गावातील रस्त्यांचे काँक्रिटीकरण करणे याकामी न्यूनतम दराच्या निविदेस मान्यता देण्याबाबतच्या विषयास स्थायी समितीने मंजुरी दिली.

महापालिकेच्या शिल्लक निधीची नव्याने मुदतठेवीत गुंतवणूक करण्याबाबतच्या विषयास स्थायी समितीने मंजुरी दिली.

महापालिका क्षेत्रातील प्रभाग समिती अ मधील प्रभाग क्र.४, खारघर येथील सेक्टर २१, भूखंड क्र.१५१ येथे महापौर यांचे निवासस्थान बांधण्याच्या विषयास स्थायी समितीने मंजुरी दिली.

महापालिका हद्दीत विविध ठिकाणी हजेरी बूथकरिता कंटेनर केबिन खरेदी करून बसविणे याकामी न्यूनतम दराच्या निविदेस मान्यता देण्याबाबतच्या विषयास मंजुरी देण्यात आली.

महापालिका प्रभाग समिती अ,ब,क,ड हद्दीतील सिडको प्रशासनाकडून हस्तांतरित क्षेत्रातील आपत्कालीन परिस्थितीत व पावसाळ्यापूर्वी नाले साफसफाई करणे याकामी न्यूनतम दराच्या निविदेस मान्यता देण्याबाबतच्या विषयास मंजुरी देण्यात आली.

महापालिका प्रभाग समिती ड, भूखंड क्र.१३, काळुंद्रे येथे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र बांधण्याबाबतच्या विषयास स्थायी समितीने मंजुरी दिली.

महापालिका क्षेत्रात पाच शि टॉयलेट खरेदी करून बसविणेकामी प्राप्त न्यूनतम दराच्या निविदेबाबत निर्णय घेण्याबाबतच्या विषय सभेत नामंजूर करण्यात आला, तर महापालिका हद्दीत केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत सन २०१५-२०१६, २०१६-२०१७ अंतर्गत हरित क्षेत्र विकसित केलेल्या, वृक्षलागवड व लॉन या झालेल्या कामांची निगा, दुरुस्ती-देखभाल करण्याबाबतच्या विषयास स्थायी समितीने स्थगिती दिली.





पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
शनिवार, दि. २१ मे २०२२ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स

सर्व केंद्रांवर (वयोगट : १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल

Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.

# पनवेल महापालिका क्षेत्रात विकासकामांचे भूमिपूजन

## नगरसेविका रूचिता लोंढे यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम







**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापालिकेच्या नगरसेविका रूचिता लोंढे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध विकासकामांचे लोकार्पण व भूमिपूजन गुरुवारी (दि. १९) करण्यात आले. वाढदिवसाचे औचित्य साधून नाला बंदिस्त करून पादचारी मार्ग तयार करणे, रस्त्यालगत गटार व रस्त्याचे स्टॅम्प काँक्रिटीकरण करणे या कामांचे भूमिपूजन व रूचिता लोंढे यांच्या नगरसेवक निधीमधून प्रसन्न निवास सोसायटीलगत असलेल्या गल्लीत करण्यात आलेल्या स्टॅम्प काँक्रीटीकरण रस्त्याचे आणि वायफाय सेवेचे लोकार्पण भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी करण्यात आले.

पनवेल महापालिका क्षेत्रात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली व सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या पाठपुराव्यामुळे अनेक विकासकामे करण्यात येत आहेत. त्या अंतर्गत प्रभाग क्रमांक १९मधील महात्मा फुले रस्त्यावरील माऊली दर्शन ते लोकमान्य टिळक रस्त्यावरील श्री रामदास मारुती मंदिर या रस्त्याला जोडणारा नाला बंदिस्त करणे या २० लाख ९५ हजार ६२२ रुपयांचे कामाचे व ताम्हणे बंगला ते शहा प्लाझापर्यंच्या रस्त्यालगतचे गटार व पूर्ण रस्त्याचे स्टॅम्प काँक्रीटीकरण या २० लाख १९ हजार ४२४ रुपयांच्या कामाचे भूमिपूजन सोहळा आणि नगरसेविका रूचिता लोंढे यांच्या नगरसेवक निधीमधून करण्यात आलेल्या प्रसन्न निवास सोसायटीलगत असलेल्या गल्लीमध्ये स्टॅम्प काँक्रीटीकरण करण्याच्या कामाचे लोकार्पण करण्यात आले.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, अनुभवी नगरसेवकांसोबत काम करीत असताना वयाने तरुण असूनसुद्धा सगळ्यांच्या बरोबरीने माझे काम असले पाहिजे, या भावनेने रूचिता लोंढे काम करीत आहेत. अशी कार्यशील नगरसेविका तुम्हाला मिळाली त्याबद्दल तुमचे अभिनंदन करतो, असे सांगून रूचिता लोंढे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

या सोहळ्याला महापौर डॉ. कविता चौतमोल, उपमहापौर सीताताई पाटील, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, स्थायी समिती सभापती अ‍ॅड. नरेश ठाकूर, प्रभाग समिती 'ड'च्या सभापती अ‍ॅड. वृषाली वाघमारे, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, भाजप नेते श्रीनंद पटवर्धन, नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, राजू सोनी, अजय बहिरा, मुकीद काझी, नगरसेविका दर्शना भोईर, राजश्री वावेकर, रूचिता लोंढे, माजी नगरसेविका नीता माळी, भाजपचे युवामोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, अभिषेक पटवर्धन, मोहन जोशी, गुरुनाथ लोंढे, संजय जैन, अंजली इनामदार यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

या वेळी नगरसेविका रूचिता लोंढे यांच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्यात आलेल्या वायफाय सेवेचा उपस्थित मान्यवरांनी शुभारंभ केला असून, प्रभागामध्ये आणखी १० ठिकाणी ही सेवा सुरु करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

# कोपरा खाडीमध्ये अवैध रेतीउपसा करणाऱ्यांवर कारवाई

## पनवेल तहसीलदारांकडून १० सक्शन पंप व एक बोट नष्ट



**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळ परिसरात मोठ्या प्रमाणात अवैध रेती उत्खनन सुरू असल्याची माहिती मिळताच पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांनी कोपरा खाडीत कारवाई करीत १० सक्शन पंप आणि एक बोट पूर्णपणे नष्ट केली.

या कारवाईदरम्यान स्वतः तहसीलदार विजय तळेकर हे महसूल विभागाच्या टीमसह घटनास्थळी हजर होते. भरतीच्या वेळी रेती उत्खनन करण्यासाठी आलेल्या सक्शन पंप आणि बोट महसूल पथकाला दिसताच क्षणी तहसीलदारांच्या आदेशाने ही कारवाई करण्यात आली. गॅस कटरच्या साहाय्यानेही रबरी सक्शन पंप नष्ट करण्यात आले.

या वेळी तहसीलदारांच्या सोबत नायब तहसीलदार, तीन सर्कल अधिकारी आणि दोन कोतवाल उपस्थित होते. उलवा खाडीतदेखील अशाच प्रकारच्या कारवाईची गरज आहे. विमानतळासाठी केलेल्या भरावाच्या रस्त्यातून रात्रीच्या वेळी उलवा खाडीतून उत्खनन केलेली रेतीची वाहतूक केली जाते, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

**तक्रार प्राप्त झाल्यावर वेळोवेळी आम्ही कारवाई करीत आलो आहोत. पुढेही अशा प्रकारे कारवाई सुरूच राहील.**

**–विजय तळेकर, तहसीलदार, पनवेल**



पनवेल : महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त माजी उपमहापौर आणि आरपीआयचे कोकण अध्यक्ष जगदिश गायकवाड यांच्यासह अनेक मान्यवरांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, नगरसेवक संतोष भोईर, निलेश बावीस्कर, राजू शर्मा तसेच पदाधिकारी उपस्थित होते.

# ज्येष्ठ नेते स्व. हरिभाऊ खानावकर यांचा प्रथम पुण्यस्मरण दिन

## आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले अभिवादन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नावडे येथील भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते स्व. हरिभाऊ बाळाराम खानावकर यांचा प्रथम पुण्यस्मरण दिन शुक्रवारी झाला. त्यानिमित्त नावडे येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्व. हरिभाऊ खानावकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

नावडे येथे स्व. हरिभाऊ बाळाराम खानावकर यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमीत्त कीर्तन, हरिपाठ, प्रवचन आणि भजन या धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी भाजप महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्ष तथा पंचायत समिती सदस्या रत्नप्रभा घरत, पनवेल महापालिकेचे नगरसेवक प्रवीण पाटील, महिला मोर्चा तालुका उपाध्यक्ष प्रतिभा भोईर, माजी नगरसेविका नीता माळी, पनवेल शहर महिला मोर्चा अध्यक्ष वर्षा नाईक, भाजप पनवेल महापालिका युवा मोर्चा अध्यक्ष दिनेश खानावकर, कमलाकर बाळाराम खानावकर, मोहन बाळाराम खानावकर, मंगेश बाळाराम खानावकर, मीना हरी खानावरक, प्रशांत हरि खानावकर यांच्यासह पदाधिकारी, ग्रामस्थ आणि कुटूंबीय उपस्थित होते.



## निवडक

### चारचाकीच्या विविध पार्ट्सची चोरी

**पनवेल** : तालुक्यातील आजिवली हायस्कूलजवळील एका गॅरेजमध्ये असलेल्या टाटा झेस्ट चारचाकीच्या गियर बॉक्ससह इंजिनच्या चेंबरची चोरी झाल्याची घटना घडली आहे. अबिद मोहम्मद असरुद्दिन शेख (वय २२) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दोन आरोपींनी संगनमताने अदिब शेख यांच्या गॅरेजमधील टाटा झेस्ट चारचाकीच्या गियर बॉक्ससह इंजिनच्या चेंबर असे मिळून एकूण २२ हजार रुपये किंमतीचा माल चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### महिलेचा लैंगिक छळ; गुन्हा दाखल

**पनवेल** : ओला गाडीत बसलेल्या महिलेचा विनयभंग करून तिचा लैंगिक छळ केल्याने ओला चालकाविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २३ वर्षीय महिला रा. इंडिया बुल्स ग्रीन लॅवेंडर्स हौ. सोसायटी हिला ओला गाडीवरील चालकाने इंडिया बुल्स सोसायटी ते पनवेल एसटी स्टॅन्डदरम्यान घेऊन जात असताना हायवेवर एका ठिकाणी गाडी थांबवून महिलेचा विनयभंग करून तिचा लैंगिक छळ केला. या बाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली असून ओला गाडीवरील (क्र. एमएच ०१ सीव्ही ८२६१) चालक मिराज हुसेन सिद्दीकी याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आंबा, तांदूळ महोत्सवाचा शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बचतगटांची उत्पादने शहरी भागात अधिकाधिक विक्री होण्यासाठी त्या उत्पादनांचा दर्जा, मांडणी आणि सजावटीसह पॅकेजिंगकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे मत ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी परमेश्वर राऊत यांनी व्यक्त केले.



नेरुळ येथील सेक्टर १८ येथे विद्याभवन शाळेच्या आवारात उमेद अंतर्गत स्थापित महिला स्वयंसाह्ययता समुहांनी पिकवलेल्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ मिळवून देण्याच्या उद्देशाने २० ते २२ मे या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आंबा आणि तांदूळ महोत्सवाच्या उद्घाटनावेळी ते बोलत होते. या वेळी कोकण विभागीय माहिती उपसंचालक डॉ. गणेश मुळे, ग्रामीण जीवनोन्नती अभियानच्या उपसंचालक शीतल कदम, पुणे विद्यार्थी गृह, विद्याभवन शैक्षणिक संकुलाचे संचालक दिनेश मिसाळ, स्माईल्स् फाउंडेशनचे कार्यवाहक धीरज आहुजा, अध्यक्ष उमा आहुजा, सदस्य शालिनी विधानी, शेफाली नायर, सुरजित सिंग आदी उपस्थित होते.

परमेश्वर राऊत पुढे म्हणाले की, बचत गटांनी आपल्या उत्पादनांचा दर्जा वाढविण्याकडे लक्ष द्यावे. आपण उत्पादित केलेल्या वस्तू या शुद्ध, नैसर्गिक व सेंद्रिय आहेत, परंतु त्यांची विक्री वाढविण्यासाठी त्यांचे सादरीकरण सुंदर आणि ग्राहकांना आकर्षित करणारे असावे. यासाठी बाहेरील बाजारपेठांचा, उत्पादनाचा अभ्यास करण्याची गरज असल्याचे सांगितले.

या महोत्सवाचा शुभारंभ कोकण विभागाचे माहिती उपसंचालक डॉ. गणेश मुळे यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आला. नावीन्यपूर्ण वस्तू खरेदीसाठी या आंबा आणि तांदूळ महोत्सवाला भरभरुन प्रतिसाद द्यावा, असे आवाहन डॉ. गणेश मुळे यांनी या वेळी केले.

# भाजप जिल्हा चिटणीस रमेश नायर यांची केंद्रीय ॲडवाईजरी कमिटीमध्ये निवड



**कळंबोली : वार्ताहर**

भाजपचे रायगड जिल्हा चिटणीस रमेश नायर यांची केंद्र शासनाच्या डिपार्टमेंट ऑफ टेलीकम्युनिकेशन टेलिफोन ॲडवाईजरी कमिटीमध्ये सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे.

केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी रमेश नायर यांचे नाव सुचविले व त्यांना ॲडवाईजरी कमिटी मेंबर असे पद दिले. त्यांना मुंबई, ठाणे, नवी मुंबई हे तीन कामाचे ठिकाण नेमून देण्यात आले आहे. रमेश नायर यांच्या निवडीबद्दल त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# समर्पित आयोगाच्या भेटीसंदर्भात मदत कक्ष स्थापन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नागरिकांच्या मागास प्रवर्गास आरक्षण देण्यासंदर्भात नागरिकांची मते जाणून घेण्यासाठी गठित समर्पित आयोग बुधवारी (दि. २५) कोकण भवन येथील विभागीय आयुक्त कार्यालयात भेट देणार आहे. या भेटीदरम्यान नागरिक, संस्थांची मते जाणून घेणार असून निवेदने स्वीकारण्यात येणार आहेत. यासाठी रायगड जिल्हाधिकारी कार्यालय येथे मदत कक्ष स्थापन करण्यात आला आहे.


महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसी, व्हीजे एनटी आरक्षण देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे शासनाने समर्पित आयोग गठीत केला आहे. त्यानुसार राज्यातील ग्रामीण आणि शहरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नागरिकांच्या मागास प्रवर्गातील आरक्षणासाठी जनतेची मते जाणून घेण्यासाठी आणि या क्षेत्रात काम करणाऱ्या विविध सामाजिक संघटना यांची निवेदने स्वीकारण्यासाठी हा समर्पित आयोग विभागनिहाय भेटी देणार आहे. हा आयोग कोकण भवन येथील कोकण विभागीय आयुक्त कार्यालयात दुपारी २.३० ते ४.३० या वेळेत भेट देणार आहे. या वेळी नागरिकांना वेळेत निवेदन देता यावेत यासाठी भेटीच्या दिनांकापूर्वी कोकण विभागीय आयुक्त कार्यालयात नाव नोंदणी करावी, असे आवाहन आयोगातर्फे करण्यात आले आहे, तसेच यासंदर्भात रायगड जिल्हाधिकारी कार्यालय स्तरावर मदत कक्ष स्थापन करण्यात आला असून सामान्य शाखेतील लिपीक स्वप्नील कदम (मो. क्र.८२३७१६८७८९) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

# पनवेलचे इरफान भोपाली यांची सिनेक्षेत्रात भरारी

## १० जूनला 'मजनू' येणार प्रेक्षकांच्या भेटीला

**पनवेल : वार्ताहर**

सोनाई फिल्म क्रिएशन निर्मित 'मजनू' चित्रपटाचा टिझर लाँच सोहळा नुकताच झाला असून हा चित्रपट १० जून रोजी प्रदर्शित होणार आहे. या वेळी इरफान. एम. भोपाली यांनी मराठी फिल्म इंडस्ट्रीला पुढे नेण्याचे स्वप्न असल्याचे सांगितले.



या टिझरमुळे मजनू हा चित्रपट एक तरल प्रेमकहाणी असेल, असे स्पष्ट होत असले तरी नितीश चव्हाण, सुरेश विश्वकर्मा व सहकलाकारांच्या भूमिकेमुळे या प्रेमकहाणीत कोणते डिस्ट आणि टर्न्स येणार आहेत हे जाणून घेण्यासाठी प्रेक्षकांना अजून थोडी वाट बघावी लागणार आहे. मजनू सिनेमा म्हणजे शाळा संपवून कॉलेजमध्ये प्रवेश घेतल्यानंतर तेथील वातावरणात वावरताना प्रत्येक युवक हा स्वतःला मजनू समजू लागतो. प्रेमाची खरी ओळख तरुण, तरुणांना याच काळात होते. त्यांच्या या भावविश्वावर आधारित हा चित्रपट एक परिपूर्ण पॅकेज आहे. मजनूमध्ये प्रेम, संघर्ष, सस्पेन्स विरह यांसारखे अजूनही विविध पैलू प्रेक्षकांना बघायला मिळणार आहेत, तसेच चित्रपटातील गाणी प्रेक्षकांच्या मनावर नक्कीच भुरळ घालतील.

मजनू चित्रपटाचे निर्माते गोवर्धन दोलवाडे, भारत चंगेडे, डॉ. दिपाली गर्ने सानप असून कथा, पटकथा आणि संवाद गोवर्धन दोलवाडे यांचे आहे. चित्रपटात नितीश चव्हाण, रोहन पाटील, स्वेतलाना अहिरे, सुरेश विश्वकर्मा, मिलिंद शिंदे, अरबाज शेख, प्रणव रावराणे, आदिती सारंगधर, माधवी जुवेकर, भक्ती चव्हाण यांच्या महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. चित्रपटाला संगीतकार पी. शंकरम, सचिन अवघडे, साजन विशाल यांचे संगीत लाभले आहेत, तर गीतकार दीपक गायकवाड आणि गोवर्धन दोलताडे यांच्या गीतांना इंडियन आयडॉल फेम सलमान अली, आदर्श शिंदे, संदीप उबाळे, बेला शेंडे, आनंदी जोशी व विशाल चव्हाण यांचा स्वरसाज लाभला आहे. संकलन चेतन सागडे यांनी केले असून, कला दिग्दर्शक महेश कोरे, डिओपी एम. बी. अळ्ळीकट्टी, साउंड डिझायनर राशीदादा बुट्टे, कॉस्च्युम डिझायनर संदीप गाजुल, पार्श्वसंगीत विनीत देशपांडे यांचे तर कोरिओग्राफर हाईट मंजू आहेत.




# डम्पर उलटल्याने सायन–पनवेल महामार्ग झाला चार तास ठप्प

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वाशीहून मुंबईच्या दिशेने जाणारा मालवाहू डम्पर शुक्रवारी (दि. २०) सकाळी वाशी खाडी पुलावरील दुभाजकावर धडकून रस्त्यावर आडवा झाल्याने दोन्ही मार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. वाहतूक पोलिसांनी अपघातग्रस्त डम्पर क्रेनच्या सहाय्याने बाजूला काढून दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास वाहतूक सुरळीत केली. या प्रकारामुळे चार तासांपेक्षा जास्त काळ वाहतूक कोंडीत अडकलेल्या हजारो प्रवाशांना त्याचा फटका बसला.

अपघातग्रस्त डम्पर शुक्रवारी सकाळी ५ वाजण्याच्या सुमारास खडीचा भुगा घेऊन वाशीहून मुंबईच्या दिशेने जात होता. वाशी खाडी पुलावर आला असताना चालकाचा डोळा लागल्याने त्याचे नियंत्रण सुटले. त्यामुळे डम्पर रस्ता दुभाजक तोडून दोन्ही रस्त्याच्या मधोमध आडवा झाला. त्यामुळे दोन्ही बाजूकडील रस्त्यावर वाहतूक ठप्प झाली. या अपघातात डम्परचालक किरकोळ जखमी झाल्याने तो घटनास्थळावरून निघून गेला. वाहतूक पोलिसांनी मालकाला संपर्क साधून पाचारण केले. त्यानंतर वाहतूक पोलिसांनी अपघातग्रस्त डम्पर बाजूला काढण्याचा प्रयत्न सुरू केला.

सकाळी ७ वा.च्या नंतर वाहनात वाढ झाल्यानंतर मुंबई लेनवरील वाहतूक कोंडी थेट नेरूळपर्यंत, तर पुणे लेनवरील वाहतूक देवनारपर्यंत पोहचली. घटनास्थळी सकाळी ९ वाजता डम्परमालक आल्यानंतर वाहतूक पोलिसांनी जेसीबीच्या सहाय्याने रस्त्यावर पडलेला खडीचा माल दुसऱ्या डम्परमध्ये भरला. त्यानंतर अपघातग्रस्त डम्पर बाजूला केला. दुपारनंतरदेखील सायन–पनवेल मार्गावरील वाहतूक संथगतीने सुरू होती.

**अपघातानंतर डम्परचालकावर गुन्हा दाखल करण्यासाठी तसेच डंपरची कागदपत्रे आणि फिटनेस तपासून योग्य ती कारवाई करण्यासाठी वाशी आरटीओला पत्रव्यवहार करण्यात आला आहे.**

**–पुरुषोत्तम कराड, उपायुक्त, नवी मुंबई वाहतूक विभाग पोलीस**

## संपादकीय

# दौऱ्याचे राजकारण

महाराष्ट्रातील सगळ्या समस्या संपुष्टात आल्या असून सर्वत्र आलबेल आहे आणि अयोध्येला कोण जाणार आणि कोण जाणार नाही, एवढाच एकमेव प्रश्न उरला असल्याचे चित्र सध्या निर्माण झाले आहे. प्रकृतीच्या कारणास्तव राज ठाकरे यांनी आपला अयोध्या दौरा तूर्तास स्थगित केला असला तरी लवकरच तो व्यवस्थितपणे पार पडेल यात शंका नाही. देवाचे दर्शन कोणीही, कुठेही घेऊ शकते. महाराष्ट्रातील भाजप नेत्यांनी हीच भूमिका वेळोवेळी बोलून दाखवली आहे.

**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी मशिदींवरील भोंग्यांचा प्रश्न उपस्थित करतानाच हनुमान चालिसा दुप्पट आवाजात लावण्याचा पर्याय दिला होता. राज यांचे हे आवाहन सर्वदूर पसरले. महाराष्ट्रातल्या छोट्यातल्या छोट्या गावापासून उत्तर प्रदेशात देखील हनुमान चालिसाचे सूर दुमदुमू लागले. त्याच सुमारास राज यांनी लवकरच आपण अयोध्येचा दौरा करणार असल्याचे जाहीर केले होते. राज यांनी अचानक हिंदुत्वाची हाक दिली हा काही योगायोग नव्हे. महाविकास आघाडी सरकारमध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या मांडीला मांडी लावून बसणाऱ्या शिवसेनेची अवस्था अडचणीची झाली आहे. ज्यांच्या विरोधात आजवरच्या सर्व निवडणुका लढवल्या, हिंदुत्वाची भूमिका जोरकसपणे मांडली, त्यांच्यासोबत संसार थाटणाऱ्या शिवसेनेला आपल्या वाट्याचे हिंदु मत गमावण्याची भीती निर्माण झाली. राज यांच्या अयोध्या दौऱ्याने त्यांची चांगलीच पंचाईत झाली होती. म्हणूनच पाठोपाठ पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी देखील आपली अयोध्या वारी जाहीर करून टाकली. भारतीय जनता पक्षाची बी टीम अशी मनसेची संभावना करण्यात महाविकास आघाडीचे नेते धन्यता मानत राहिले. परंतु प्रत्यक्षात उत्तर प्रदेशातील भाजपच्या नेत्यांनी राज यांच्या अयोध्या दौऱ्याला विरोधच केला. राज ठाकरे यांनी ५ जून रोजी होणारा आपला नियोजित अयोध्या दौरा तूर्तास स्थगित केला आहे. आदित्य ठाकरे हे १५ जून रोजी अयोध्येला जाण्याच्या बेतात आहेत. काही वर्षांपूर्वी राज यांनी मुंबईमध्ये उत्तर भारतीयांविरोधात आंदोलन छेडले होते. त्यामुळेच त्यांच्या अयोध्या दौऱ्याला उत्तरेतील नेत्यांनी अडसर घातला. परंतु श्री रामलल्लाच्या दर्शनाला अशी आडकाठी करता येणार नाही ही भूमिका विरोधीपक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांनी वेळोवेळी जाहीररित्या बोलून दाखवली आहे. अयोध्या दौऱ्याबाबत आपला राजकीय वापर होत आहे याचे भान राज यांनी ठेवले पाहिजे अशी टीका शिवसेनेचे प्रवक्ते संजय राऊत यांनी केली. त्याला तसा काही अर्थ नाही. खुद्द राऊत यांचाच सर्वाधिक गैरवापर महाविकास आघाडीतील कुठला पक्ष करीत आहे हे साऱ्यांनाच ठाऊक आहे. त्यामुळे असल्या सवंग टीकाटिप्पणीकडे लक्ष देण्याची गरज नाही. महाराष्ट्रातील राजकारणाच्या मुख्य प्रवाहात परतण्याची आणखी एक संधी मनसेला या निमित्ताने मिळालेली दिसते. हिंदुत्वाची कास सोडून दिल्यानंतर शिवसेनेची अवस्था राजकीयदृष्ट्या अडचणीची झाली असून आगामी मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत त्याचे स्पष्ट चित्र बघायला मिळेल. शिवसेनेची मुंबईवरील पकड सोडवण्यासाठी मनसेने भाजपला अनुकूल अशी भूमिका घेणे हिताचे ठरेल असे वाटते. अन्यथा देखील राज ठाकरे यांच्या प्रस्तावित अयोध्या दौऱ्याला कुणाचा विरोध असण्याचे काही कारण नाही. बाकी पक्षांच्या अयोध्यावारीला कुठलेच महत्त्व नाही, ते आले काय आणि गेले काय दोन्ही सारखेच.**

# कोकणातील मासेमारी अडकली समस्यांच्या 'जाळ्यात'

रायगड जिल्ह्यासह कोकणला ७२० कि.मी.लांबीचा विस्तृत व अथांग असा सागरी किनारा लाभला आहे. त्यामुळे या ठिकाणी बहुतांश लोक मत्स्यव्यवसायावर आपली उपजीविका भागवत असतात. मात्र आजघडीला मत्स्यव्यवसाय चारीबाजूंनी उद्ध्वस्त होताना दिसत आहे. इथली मासेमारी समस्यांच्या जाळ्यात अडकली आहे. त्यामुळे मत्स्यव्यावसायिकांवर उपासमारीचे संकट ओढवले आहे. सततच्या वाढत्या कर्जाने आत्महत्या करण्याची नामुष्की देखील ओढविण्याची भीती मत्स्यव्यावसायिकांमध्ये आहे.

रायगड जिल्ह्यातील अलिबाग, मुरुड, श्रीवर्धन व कोकण किनारपट्टीत समुद्रकिनारी जेलीफिशचे थैमान सुरू झाले आहे. मासेमारीत घातक जेलीफिशची वाढ झाल्याने कोळीबांधवांना मासळी मिळणे मुश्किल झाले आहे. यामुळे उत्पादन घटले आहे. परिणामी मच्छीमार संकटात सापडला आहेत. देशाला एकूण ७,५१६ किमीचा सागरी किनारा लाभलेला आहे. त्यावर एकूण ३२८८ मासेमारी गावे असून जवळपास ४० लाख लोक यावर अवलंबून असल्याचे केंद्रीय सागरी मत्स्य विभागाने २०१० मध्ये केलेल्या नोंदीतून समजते. रायगड जिल्ह्यातील समुद्रकिनारी दिघी, आदगाव, दिवेआगर, भरडखोल, जीवना, बागमांडला व मुरुड तसेच अलिबाग तालुक्यात देखील नवेदर नवगाव, रेवस, बोडणी, मांडवा, वरसोली अशी मासेमारीसाठी अनेक प्रसिद्ध बंदर आहेत, मात्र येथे जेलीफिशमुळे उत्पादनावर विपरीत परिणाम झाल्याने कोळी बांधव व मत्स्यव्यावसायिक चिंताग्रस्त आहेत.

अनेक स्थानिक या समुद्रामध्ये पारंपरिक पद्धतीने किंवा छोट्या होडीने मच्छीमारी करून उपजीविका करतात. दरम्यान वातावरणातील बदल, अवेळी वादळी पावसाची हजेरी अशा अनेक संकटांतून सामोरे जाऊन मासेमारी दुष्काळ सहन करतात. अवकाळी पाऊस व बदलणारे हवामान यामुळे मोठ्या प्रमाणात मासळी मिळणे फार मुश्किल झाले आहे. आठ ते दहा दिवस खोल समुद्रात जाऊन सुद्धा पुरेशी मासळी मिळत नसल्याने व्यावसायिक चिंतेत आहेत. डिझेल खर्च, बर्फ व होडीवर काम करणाऱ्या लोकांची मंजुरीसुद्धा सुटत नाही. या मुळे हा व्यवसाय कसा करावा हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यातच सध्या खोल समुद्रात जेलीफिश वाढल्याने जाळ्यात त्याचेच प्रमाण जास्त असल्याने मासळी फार कमी मिळत आहे. अवकाळी पाऊस व वादळामुळे मच्छिमारांनी सध्या होड्या समुद्रकिनारी नांगरल्या आहेत.

मुरुड तालुक्यात छोट्या व मोठ्या अशा एकूण ६५० होड्या असून त्यापैकी निम्म्यापेक्षा जास्त होड्यांनी किनारा गाठला आहे. मागील दोन वर्षांपासून चक्रीवादळ, निसर्ग वादळ, अवकाळी पाऊस यामुळे निसर्गाचा समतोल बिघडला. मासळी दूरवर निघून गेल्याने पुन्हा एकदा बोटी किनाऱ्याला परत आलेल्या आहेत.

जूनमध्ये शासनातर्फे मासेमारी न करण्याचे आदेश दिले जातात. त्यावरून साधारतः २८ मेपासून मच्छीमार होड्या किनाऱ्याला लावत असतात. परंतु यंदा जेलीफिशचा फटका बसून मासळीच मिळत नसल्याने मच्छीमारांनी स्वतःहून लवकरच होड्या किनाऱ्यावर साकारून पुन्हा मासेमारीला न जाण्याचे ठरविले आहे. एकदरा पूलाच्या कठड्याला जाळ्या सुकविण्याचे चित्र सध्या पहावयास मिळत आहे. यंदा किमान एक महिना अगोदर मासेमारीचा काळ समाप्त झाला असून खूप लवकर मासेमारी संपुष्टात आली आहे. मासळी नसल्यामुळे होड्या किनारी आल्याने कोळीबांधवांचा उदरनिर्वाहाचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

**खबरबात**
**धम्मशील सावंत**

दरम्यान खोल समुद्रात गेल्यावर फिशिंगवाले व जाळीवाले मासेमारीचे उत्पादन कमी झाले आहे. मासेमारीत डोलवीमध्ये मोठ्या प्रमाणात जेलिफिश अडकल्याने ती शरीराला घातक ठरत आहेत. हातापायांना, डोळ्यांना इजा होण्याची भीती मासेमारीला निघताना मनात कायम असते असे जीवना कोळीवाडाचे माजी चेअरमन बाळकृष्ण रघुवीर यांनी सांगितले. मागील काही वर्षात कोकण किनारपट्टीत जेलीफिशचे प्रमाण वाढल्याचे दिसत आहे. जेलीफिशच्या उपद्रवामुळे मत्स्य उत्पादन घटत आहे. सागरातील जीवाणू हे खाद्यासाठी एकमेकांवर अवलंबून असतात. सध्या जेलिफिशचे प्रमाण वाढल्याचे दिसते असे सहाय्यक मत्स्य आयुक्त सुरेश भारती यांनी सांगितले.



### समुद्रातील वाढते जेलीफिश चिंताजनक बाब

*जगभरात माणसाला माहित असलेल्या जेलीफिशच्या जवळपास १२०० प्रजाती आहेत. त्यातील काही एवढ्या लहान आहेत की त्या पोहताना पाण्यासोबत आपल्या पोटात जाऊ शकतात तर काही २०० किलो एवढ्या अवाढव्य आहेत. या प्राण्यांमध्ये सर्व जातीत एक गोष्ट सारखी असते, ती म्हणजे डंख मारणाऱ्या पेशी होय. या पेशी जेलीफिशच्या फ्लोट खाली असतात. या तंतुमय धाग्यांमध्ये विणलेल्या डंख मारणाऱ्या पेशी एखाद्या समुद्री जिवाच्या संपर्कात आल्यास त्याला या तंतुमय धाग्यांनी गुंडाळून त्यात असलेल्या लाखो विषारी डंख प्राण्याच्या शरीरात विष पसरविण्याचे काम करतात. ब्लू बॉटल प्रजातीच्या जेलीफिशला चुकून जरी हात लागला तरी तुम्हाला तीव्र वेदना आणि श्वास घेण्यास त्रास होऊ शकतो. बॉक्स जेलीफिश प्रजातीमुळे फिलिपाईन्स देशात दरवर्षी २० ते ४० लोक मृत्युमुखी पडत असल्याच्या वैद्यकीय नोंदी आहेत. हे प्राणी स्वत: पोहत नाहीत. समुद्राचे प्रवाह जिथे घेऊन जातील तिथे ते जातात. पण अलीकडे अरबी समुद्रात यांचे प्रमाण कमालीचे वाढत आहे ही खूप चिंताजनक बाब आहे.*

### कोळी बांधवांची आर्थिक स्थिती बिकट

*जेलीफिश अत्यंत घातक व विषारी आहे. जेलीफिशने शारीरिक व आर्थिक हानी होत आहे. आज नैसर्गिक संकटे देखील कोळी बांधवांना जगू देत नाहीत. आम्ही वारंवार सरकारकडे निवेदनाद्वारे प्रश्न व समस्या मांडतोय, मात्र सरकारकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही. जेलीफिशने मत्स्य उत्पादन घटल्याने मच्छीमार कोळी बांधवांची आर्थिक परिस्थिती बिकट झाली असल्याचे महादेव मच्छीमार संघटनेचे चेअरमन उल्हास वाटखरे यांनी बोलताना सांगितले.*

### त्वरित शासन मदतीची अपेक्षा

*सद्या कोळीबांधवांच्या पदरात फायद्यापेक्षा तोटा अधिक आहे. मासेमारी नौका किनाऱ्यालाच उभ्या असल्याने नोकरांचे पगार, डिझेल, भत्ता खर्च, जाळीखर्च व कर्जाचे थकलेले हप्ते कसे भरायचे असा प्रश्न आहे. जेलीफिश सारख्या नैसर्गिक आपत्तीने अनेकांचे व्यवसाय ठप्प आहेत. त्याकरिता शासन स्तरावर आम्हा कोळी बांधवांना मदत मिळावी असे दिघी कोळी समाज अध्यक्ष किरण कांदेकर यांनी या दरम्यान बोलताना सांगितले.*



## बदलते तंत्रज्ञान




### आता फक्त अॅडमिनलाच जाणार नोटीफिकेशन

व्हॉट्सअॅप सध्या अशा एका नवीन फीचरवर काम करत आहे, ज्यामुळे तुम्ही व्हॉट्सअॅप ग्रुप सोडला तरी कोणालाही कळणार नाही. नक्की हे काय आहे आपण आज जाणून घेणार आहोत हॉट्सअॅप आपल्या वापरकर्त्यांचा अनुभव वाढविण्यासाठी सतत नवीन फीचर प्रदान करते. व्हॉट्सअॅपवर वापरकर्त्यांसाठी बरीच सोय करण्यात आली आहे. ज्यामुळे ते त्यांची कामे सोपी करू शकतात. व्हॉट्सअॅपवरील ग्रुप्स खूप उपयुक्त आहेत. यांच्या मदतीने एखादी माहिती एकाच वेळी अनेकांपर्यंत पोहोचते. परंतु याचे काही दुष्परिणाम देखील आहेत. जसे की जेव्हा आपण ग्रुप सोडतो तेव्हा सर्वांना याबाबत कळते. नवे फीचर रिपोर्टमध्ये असेही सांगण्यात आले आहे की, हे फीचर सध्या डेव्हलपमेंट स्टेजवर असून आणि ते बीटा यूजर्सपर्यंत पोहोचण्यासाठी थोडा वेळ लागेल. कोणालाही न कळत ग्रुप सोडण्याचे हे फीचर अँड्रॉइड, आयओएस आणि डेस्कटॉप यूजर्ससाठी येईल असे मानले जात आहे. मात्र, ते कधी सादर होणार हे अजून सांगण्यात आलेले नाही.




दुसरीकडे, व्हॉट्सअॅप लवकरच ५१२ लोकांना एका ग्रुपमध्ये जोडण्याची परवानगी देईल. सध्या त्याची मर्यादा २५६ सदस्यांची आहे. याशिवाय व्हॉट्सअॅप कम्युनिटीज टॅबवर देखील काम करत असल्याची माहिती मिळाली आहे. जी लवकरच वापरकर्त्यांसाठी सादर केली जाईल. याची वापरकर्त्यांनी नोंद घ्यावी.

# दहशतवाद जगासमोर आव्हान

दहशतवादाचा फटका जगातील अनेक देशांना बसत आहे. त्यामुळे हा प्रश्न कोणत्याही एका देशाचा नाही. दहशतवाद जगात सर्वत्र वेगाने पसरत आहे. त्यामुळे जागतिक शांततेला धोका निर्माण झाला आहे. २१ मे हा दिवस दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस म्हणून पाळला जातो. २१ मे या दिवशी भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची पुण्यतिथी असते. हाच दिवस दहशतवादविरोधी दिवस म्हणून संपूर्ण देशात पाळला जातो. या देशाचे सर्वात तरुण पंतप्रधान म्हणून त्यांनी सन १९८४ ते सन १९८९ पर्यंत काम पाहिले. संपूर्ण जगात शांतता प्रस्थापित व्हावी व अहिंसेचा संदेश सर्वत्र पोहोचवावा, तसेच देशासाठी दहशतवादाविरोधात लढणाऱ्या हजारो सैनिकांच्या बलिदानाचा सन्मान करणे, भावी पिढीला मूलगामी प्रभावापासून वाचविणे, त्यांच्या मनामध्ये देशाच्या प्रगतीसाठी, संरक्षणासाठी जागरुकता निर्माण करणे, हादेखील या दिवसाचा उद्देश आहे.

आजच्या स्थितीला संपूर्ण जगात ज्या-ज्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे, त्यापैकी सर्वात मोठी आणि अवघड समस्या म्हणजे दहशतवाद व हिंसाचार आहे. या दहशतवादामुळेच संपूर्ण जगाची शांतता भंग पावली आहे. फार मोठ्या प्रमाणावर सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

दहशतवाद या समस्येने देशाची फार मोठी आर्थिक हानी केलेली आहे. दहशतवाद व हिंसाचार याचे मूळ हे महत्त्वाकांक्षेत आहे. आज सर्व जगच दहशतीच्या छायेखाली सापडलेले असून, कोणत्या ठिकाणी कधी हल्ला होईल याची सततची टांगती तलवार प्रत्येकाच्या डोक्यावर लटकत असते. कोणताही मनुष्य आज सुरक्षित आहे, हे खात्रीपूर्वक सांगणे कठीण झालेले आहे. मुंबई, दिल्लीसारख्या मोठ्या शहरातील माणूस सकाळी घराबाहेर पडला, तर संध्याकाळी तो सुखरूप घरी परतेल की नाही याची खात्री देता येत नाही, ही वस्तुस्थिती आहे.


भारतातील दहशतवादाचा विचार केला तर, अनेक वेळा दहशतवादी हल्ले झालेले आहेत. मग तो मुंबई लोकल ट्रेनमधील साखळी बॉम्ब हल्ला असेल, सी.एस.टी. रेल्वेस्टेशनवर तसेच हॉटेल ताज, हॉटेल ओबेरॉय येथील हल्ला असेल, या देशाचा मानबिंदू म्हणून ज्याकडे आदराने पाहिले जाते त्या पवित्र संसदेवरदेखील अतिरेक्यांनी हल्ला केला. तसेच उरी, पुलवामा येथे सीआरपीएफ जवानांच्या गाड्यांच्या ताफ्यावर झालेला हल्ला असेल असे अनेक वर्षानुवर्षे दहशतवादी प्रवृत्ती हल्ले करत आहेत. जम्मू-काश्मीर येथे नियमित असे हल्ले होत आहेत. त्यामुळे हजारो निरपराध नागरिक, कर्तव्यावरील भारतीय सैनिक पोलीस दल यांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. दहशतवाद हे आता एक आव्हान ठरत आहे.

दहशतवाद ही जगातील सर्वात मोठी समस्या आहे. तसेच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर ही सर्वात मोठी समस्या निर्माण झाली आहे. त्याचप्रमाणे ही जागतिक स्तरावरची सुद्धा समस्या आहे, ज्याचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे सर्व देशांवर परिणाम होत आहे. अनेक देश दहशतवादाचा सामना करत आहेत. दहशतवाद हा एक हिंसाचाराचा प्रकार आहे जो बेकायदेशीर आहे. याचा उपयोग लोकांना घाबरविण्यासाठी केला जातो.

**निमित्त**




**क्लिक...क्लिक...!**



**मुरूड : ओहोटीमुळे जंजिरा किल्ल्यासमोरील खडक दिसू लागलेत. वर्षातून दोन वेळा अशी मोठी ओहोटी पाहायला मिळते. पर्यटक या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित असतात. (छाया : सुधीर नाझरे)**

## आरोग्य प्रहर



### सकाळचा नाश्ता स्किप करणे पडेल महागात

बऱ्याचदा लोक सकाळच्या नाश्ता करणे टाळतात. कधी ऑफिसच्या कामासाठी तर कधी कार्यालयात पोहोचण्यास उशीर होऊ नये म्हणून नाश्ता केला जात नाही. मात्र तुम्हाला माहिती आहे का की, सकाळचा नाश्ता टाळला तर आरोग्यावर किती वाईट परिणाम होणार? खरं तर सकाळचा नाश्ता आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. चला तर जाणून घेऊया सकाळचा नाश्ता करण्याचे फायद काय आहेत. सकाळी नाश्ता केल्याने तुमच्या कॅलरीज चांगल्या प्रकारे बर्न होतात कारण पचनशक्ती चांगले कार्य करते. याशिवाय शरीरातील रक्तातील साखरेची पातळीही चांगली राहते. सकाळी नाश्ता केल्याने शरीरात ऊर्जा टिकून राहते. शरीर दिवसभर सक्रीय राहते. यामुळे तुमचे वजनही संतुलित राहते आणि तुम्हाला थकवा जाणवत नाही.

सकाळचा नाश्ता देखील तुमचे आरोग्य सुधारण्याचे काम करतात. सकाळच्या नाश्त्यामध्ये कडधान्ये, प्रोटीन आणि फळे समाविष्ट करण्याचा प्रयत्न करावा. सकाळचा नाश्ता केल्याने मनाचे आरोग्य चांगले राहते आणि कामात एकाग्रता टिकून राहते. शरीराला कार्बोहायड्रेटची गरज असते. नाश्त्यात काही पदार्थ नक्की ट्राय करा. उपाशी पोटी राहू नका. अनेकदा सकाळच्या नाश्त्यात काय खायचे असा प्रश्न अनेकांना पडतो. सकाळचा नाश्ता देखील रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यास हातभार लावते. याशिवाय आपल्या त्वचेच्या आणि केसांच्या आरोग्यावरही सकाळचा नाश्ताच्या प्रभाव पडतो. तसेच डोळ्यांसाठी आणि स्नायूंसाठी हे तितकेच फायदेशीर आहे. नाश्ता न केल्याने तुम्हाला अॅसिडिटीच्या समस्येलाही सामोरे जावे लागू शकते. जर तुम्ही दररोज नाश्ता वगळलात तर तुम्हाला गॅसची गंभीर समस्या होण्याची शक्यता असते. याशिवाय तुम्हाला डोकेदुखीचा त्रासही होतो. कामात लक्षही लागणार नाही.

# माथेरानची जीवनवाहिनी शार्लोट लेकचे संवर्धन

## तलावातील गाळ काढण्याच्या कामाचा शुभारंभ

(छाया : संतोष पेरणे)





**कर्जत : बातमीदार**

ब्रिटिशकालीन शार्लोट लेकचे पाणी माथेरानसाठी जीवनवाहिनी समजले जाते. नगर परिषदेने या तलावातील गाळ काढण्याचे काम हाती घेतले आहे. या कामामुळे शार्लोट लेकची पाणी साठवण क्षमता क्षमता वाढणार आहे. या कामासाठी नगर परिषदने सव्वा सात लाखाचा निधी मंजूर केला आहे.

माथेरान नगर परिषदेच्या माध्यमातून शार्लोट लेकची दरवर्षी साफसफाई केली जाते. मात्र जंगल भागात असल्याने पावसाच्या पाण्यासोबत झाडांचा पालापाचोळा तसेच माती शार्लोट लेकमध्ये वाहून येते. त्यामुळे या तलावात दरवर्षी गाळ जमा होतो. २०१२ मध्ये डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या माध्यमातून शार्लोट लेकमधील गाळ काढण्याचे काम श्री सदस्यांनी केले होते. त्यानंतर नगर परिषद दरवर्षी मनुष्यबळ वापरून शार्लोट लेकची स्वच्छता करत आहे. येणारा पावसाळा लक्षात घेऊन माथेरान नगर परिषदेच्या मुख्याधिकारी आणि प्रशासक सुरेखा भणगे यांनी तलावातील गाळ काढण्याच्या कामाचा ठेका मंजूर केला आहे.

सव्वा सात लाख रुपये खर्च करून शार्लोट लेक मधील गाळ काढण्याचे काम केले जात आहे. हा गाळ पावसाळ्यात पुन्हा तलावात जाणार नाही, यासाठी तो अन्य ठिकाणी नेला जाणार आहे. शार्लोट लेकमधील गाळ काढण्यात येत असल्याने तलावातील पाण्याची साठवण क्षमता वाढणार आहे. सध्या तलावात २७ फूट इतके पाणी आहे. नगर परिषदेच्या बांधकाम विभागाचे पथक शार्लोट लेकमधील गाळ काढण्याच्या कामावर लक्ष ठेवून असल्याची माहिती मुख्याधिकारी आणि प्रशासक सुरेखा भणगे यांनी दिली आहे.

# दोन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या शिक्षकाला आजन्म कारावास

## माणगाव न्यायालयाचा निकाल

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील फलाणी येथील प्राथमिक शाळेच्या जुन्या इमारतीमध्ये दोन अल्पवयीन विद्यार्थिनींवर अत्याचाराचे अमानूष कृत्य करणाऱ्या नित्यानंद धोंडू पाटील या नराधमास माणगाव येथील अतिरीक्त सत्र जिल्हा न्यायालयाने गुरुवारी (दि. १९) आजन्म (मरेपर्यंत) कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

या गुन्ह्यातील फिर्यादी यांची पीडित मुलगी व तिची एक मैत्रीण फलाणी येथील जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेत इयत्ता पहिलीपासून शिक्षण घेत होत्या. त्यांच्या अज्ञानपणाचा फायदा घेऊन त्या इयत्ता दुसरीमध्ये शिकत असल्यापासून आरोपीत नित्यानंद धोंडू पाटील याने २०१६ ते १७ जुलै २०१९ या कालावधीत शाळेच्या जुन्या इमारतीच्या खोलीत जबरदस्तीने वारंवार लैंगिक अत्याचार व अनैसर्गिक अत्याचार केला. सदर प्रकार कोणाला सांगितला तर मी तुम्हाला मारेन अशी पीडित मुलींना धमकी दिली.

या प्रकरणी गोरेगाव पोलीस ठाण्यात भादविकलम ३७६(२)(एफ)(आय)(एन), ३७६ (सी)(बी), ३७६(एबी), ३७७,५०६, व पोक्सो कायदा कलम ४,६,८ तसेच अ.जा.ज.का.क.१(१)(डब्ल्यू)(i)(ii), ३(२)(७) अन्वये गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्याचा तपास माणगावचे तत्कालीन पोलीस उपअधीक्षक शशीकिरण काशिद यांनी केला. व दोषारोप पत्र माणगाव येथील जिल्हा व सत्र न्यायालयात दाखल केले. या खटल्याची सुनावणी अतिरीक्त सत्र न्यायाधीश पी. पी. बनकर यांच्या कोर्टात झाली.

या खटल्यात पीडित दोन मुलीं, एका पीडित मुलीची आई, फिर्यादी व शाळेवर असणाऱ्या सहशिक्षिका तसेच वैद्यकीय अधिकारी यांच्या साक्ष महत्त्वाच्या ठरल्या. सदर खटल्यामध्ये सहाय्यक सरकारी वकील जितेंद्र म्हात्रे यांनी सरकार पक्षाच्या वतीने काम पाहिले. सुनावणीदरम्यान पैरवी अधिकारी उदय धुमास्कर, महिला पोलीस हवालदार छाया कोपनर, हवालदार शशिकांत कासार, शशिकांत गोविलकर, पोलीस शिपाई सुनील गोळे यांनी सहकार्य केले.



साक्षीदारांची साक्ष व न्यायनिर्णयाच्या आधारे न्या. पी. पी. बनकर यांनी आरोपी नित्यानंद धोंडू पाटील याला दोषी ठरवून गुरुवारी भादवि कलम ३७६,३७७, व पोक्सो कायदा कलम ४,६,८ नुसार आजन्म (मरेपर्यंत) कारावास, सक्तमजुरीची व एक लाख ५०हजार रुपये दंड आणि दंड न भरल्यास एक वर्ष साध्या कारावासाची शिक्षा सुनावली.

# रोहेकर लोकलच्या प्रतीक्षेत

## जलद रेल्वेगाड्यांना थांबा नसल्याने प्रवाशांची गैरसोय

(छाया : महादेव सरसंबे)




**रोहे : प्रतिनिधी**

कोकण रेल्वे मार्गावरील रोहे हे महत्त्वाचे व तालुक्याचे ठिकाण आहे. मध्य रेल्वेने या स्थानकापर्यंतच्या मार्गाचे दुहेरीकरण व विद्युतीकरण केले आहे, मात्र या रेल्वे मार्गावर अद्याप लोकल चालू करण्यात आली नाही. महत्त्वाचे म्हणजे रोहे स्थानकात जलद गाड्या थांबत नसल्याने प्रवाशांचा पुर्ण भार पॅसेंजर गाड्यांवर येत असल्याने प्रवाशांचे हाल होत आहेत. त्यामुळे येथील प्रवासी प्रतीक्षेत आहेत.

मध्य रेल्वेचे शेवटचे स्थानक म्हणून रोहा रेल्वे स्थानकाची ओळख आहे. धाटाव औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यात काम करणाऱ्या बाहेरील कामगारांची या परिसरात मोठी संख्या आहे. पर्यटकांना मुरूड व तळा येथे जाण्यासाठी रोहा हा जवळचा मार्ग आहे. सध्या कोलाड, सुतारवाडीसह स्थानिक पर्यटन बहरत आहे. सरकारी नोकरी निमित्ताने बाहेरुन आलेल्या अधिकारी, कर्मचारी यांची संख्या मोठी आहे. स्थानीक व्यवसायीकांना मुंबई बाजारपेठ जवळ आहे. या साऱ्या बाबींचा विचार केल्यास प्रवास गतीमान करण्यासाठी लोकलची आवश्यकता आहे.

मध्य रेल्वेने रोह्यापर्यंतच्या रेल्वे मार्गाचे दुहेरीकरण व विद्युतीकरण पुर्ण केले आहे. पुर्वी कोकण रेल्वे मार्गावरील नियमीत पॅसेंजर व नेत्रावतीसह अन्य हंगामी गाड्या रोहे स्थानकात थांबत होत्या. मात्र कोरोनामुळे सर्वच गाड्या बंद करण्यात आल्या. आता कोरोनाची लाट ओसरल्याने रेल्वे वाहतूक व प्रवाशी दोन्ही पुर्व पदावर येण्यास सुरुवात झाली आहे. मात्र रोहा येथे थांबत असलेल्या जलद गाड्यांचा थांबा बंद केल्याने येथील प्रवाशांचे गैरसोय होत आहे. पॅसेंजर गाड्या कोकणातून भरुन येत असल्याने रोह्यातील प्रवाशांना जागा मिळत नाही. रोहा–दिवा गाडी दोन्ही वेळा भरुन जात असल्याने प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे.

पनवेल–रोहा या दरम्यान रसायनी, आपटा, पेण, नागोठणे व रोहा या महत्त्वाच्या रेल्वे स्थानकातून मोठ्या प्रमाणात प्रवाशी रेल्वेने प्रवास करीत असतात. यासह निडी, कासू, जिते व सोमाटणे या रेल्वे स्थानकातूनही प्रवाशी रेल्वेने प्रवास करत असतात. यासर्व बाबींचा विचार केल्यास या मार्गावरील प्रवाशांना लोकलची आवश्यकता आहे. त्यामुळे मध्य रेल्वेने या मार्गावर लोकल सेवा चालू करावी, अशी मागणी प्रवाशी वर्गातून होत आहे.

# पेण खारसापोली येथे गावठी हातभट्टीची दारू जप्त

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील दादर पोलीस ठाणे हद्दीतील खारसापोली येथे हातभट्टीची दारू बाळगल्याप्रकरणी पोलिसांनी बुधवारी (दि. १८) सायंकाळी एकास अटक केली.

आरोपी (रा. खारसापोली, ता. पेण) याने शासनाने प्रतिबंधित केलेली गावठी हातभट्टीची तयार दारू स्वत:जवळ बाळगून बुधवार सायंकाळी वाजण्याच्या सुमारास विक्री करीत असताना पोलिसांना मिळून आला. या वेळी त्याच्याकडून एकूण १६०० रुपयाचा किमतीचा माल पोलिसांनी हस्तगत केला. याबाबत दादर सागरी पोलीस ठाण्यात दारूबंदी अधिनियम १९४९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहाय्यक फौजदार पाटील करीत आहेत.


## Urgent Staff Required

A 40-year-old CA Firm requires for its Panvel office-

1. Asst. Tax & Audit Manager - Must be CA Inter/ CA Finalist/ Graduate with 3 years of articleship experience, must have good work experience in Tax and Statutory Audit of Pvt. Limited companies. Leave facility will be provided for the CA exam.

2. Article Assistants – 8 no.s– graduates or undergraduates with one or both groups cleared / seeking direct entry, ready to join immediately as Articles, must have completed ITT & OC course. Articles taking transfer can also apply. Wide exposure in the field of Audit, Income Tax, GST & Consulting services for national & International clients will be provided.

**Apply at : hr@eapllp.in**

**Website : www.eapllp.in**


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार **१) श्री. शशांक बाळाराम पाटील २) श्री. मयुर बाळाराम पाटील** यांनी खालील वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे मालक **श्री. आनंद श्रीपाद परांजपे** यांचेकडून विकत घेण्याचे ठरवले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे. कळंब, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|
| | | हे.आर.पॉ. | रुपये | पैसे |
| १७६ | २ | ०–९६–०० पैकी ०–७८–०० | १ | ३१ |

सबब सदर बाबत कोणाचीही दान, गहाण, साठेकरार, खरेदीखत, ताबा, कब्जा, वहीवाट, बक्षीसपत्र लिज अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांच्या आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत दाखल करावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार केला जाईल. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**दिनांक : २१/०५/२०२२**

**पत्ता : ब्लॉक नं १०३, पहिला मजला,**
**बुरहान प्लाझा, कॉलेज रोड,आयुष नर्सिंग होम समोर,**
**ममदापूर, ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१**
**मो. ९०११५५५८०१**

**सही/–**
**ॲड. अल्ताफ लियाकत डोंगरे**
(वकिल उच्च न्यायालय)

# प्लास्टिक बंदीसाठी काशीद येथे जनजागृती

(छाया : संजय करडे)



**मुरूड : प्रतिनिधी**

आम्ही संस्था, मुंबई या संस्थेच्या वतीने काशीद बीचवर नुकताच प्लास्टिक बंदीसाठी जनजागृती मेळावा घेण्यात आला. नागरिकांनी सवयी बदलून ओला व सुका कचरा वेगळा करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक जयवंत गायकवाड यांनी या मेळाव्यात केले.

रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील व उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.ज्ञानदा फणसे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच ग्रामपंचायती व अनेक स्वयंसेवी संस्था यांच्या सहयोगातून जिल्ह्यात घनकचरा व्यवस्थापनासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून आम्ही संस्था, मुंबई यांच्या वतीने काशीद बीचवर प्लास्टिक बंदीसाठी जनजागृती मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्याला काशीदच्या सरपंच नम्रता कासार, मुरूडचे गटविकास अधिकारी सुभाष वाणी, आम्ही संस्थेच्या प्रमुख परेरा व किरण पटेल यांची प्रमुख उपस्थिती होती.

ग्रामपंचायत कर्मचारी सुर्यकांत जंगम यांनी प्रास्ताविक केले. प्लास्टिक बंदीचा उपक्रम यशस्वी करून काशीदचा वेगळा आदर्श निर्माण करण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबविले जात असल्याची माहिती जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक जयवंत गायकवाड यांनी या वेळी दिली.

काशीद येथील व्यावसायीकांना ओला व सुका कचरा संकलनासाठी आम्ही संस्थेतर्फे दोन डस्टबिन दिल्या आहेत. तसेच आठवड्यातून तीन वेळा काशीद व नांदगाव या दोन ग्रामपंचायतींमधून किमान सहा हजार किलो सुका कचरा संकलन करून पुनर्प्रक्रियेसाठी पाठविला जातो, असे आम्ही संस्थेच्या प्रमुख श्रीमती परेरा यांनी सांगितले. शहाजी जाधव यांनी प्लास्टिकचे दुष्परिणाम व आम्ही संस्थेतर्फे राबविण्यात आलेले उपक्रम याची सविस्तर माहिती दिली.

प्लास्टिक बंदीसाठी काशीद ग्रामपंचायत कटिबद्ध असून ग्रामस्थांनीही कापडी पिशव्यांचा वापर वाढवावा तसेच पर्यटकांनी परिसर स्वच्छ ठेवावा, असे आवाहन सरपंच नम्रता कासार यांनी या वेळी केले. रायगड जिल्हा परिषदेच्या 'चाकोरीच्या पलीकडे' ही माहिती पुस्तिका या वेळी आम्ही संस्थेच्या प्रतिनिधी किरण पटेल व सरपंच नम्रता कासार यांना देण्यात आल्या.

संवाद तज्ज्ञ सुरेश पाटील यांनी आभार मानले. ग्रामपंचायत सदस्य संतोष राणे, ग्रामसेवक अविनाश पिंपळकर, गट समन्वयक श्रेया गद्रे यांच्यासह ग्रामस्थ या जनजागृती मेळाव्याला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल **श्री. मच्छिंद्रनाथ नारायण धुमाळ** रा. कोपर, ता. पनवेल, जि. रायगड हे खालील प्रमाणे वर्णन केलेली त्यांच्या मालकीची मिळकत त्यांचे भाऊ **श्री. धनराज नारायण धुमाळ** रा. कोपर, ता. पनवेल, जि. रायगड यांस सदर मिळकत नोंदणीकृत बक्षीसपत्राने देणार आहे.

**: मिळकतीचे वर्णन :**

**सिडको कार्यालयातील वाटपपत्र क्र. सिडको/आंवित/पुनःस्थापना/कोपर/२०१५/३०३९ दिनांक ०३/०८/२०१५**

| सांकेतिक क्रमांक | सर्वेक्षणानुसार बांधकाम क्र. | बांधकामाचे पाया/ बांधीव क्षेत्र (चौ.मी.) | बांधकामाचा वापर | आदेशानुसार भूखंड वाटपाची पात्रता ठरविण्यास अनुज्ञेय क्षेत्र चौ.मी. | भूखंड वाटपाचा तपशील | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | भूखंड वाटपाचे स्थळ | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र (चौ.मी.) |
| KOP-ICOG-२८ | KP–१३४ KP८१A KP८१B | १०५.२८ | निवासी | १९२.२० | वडघर उपरोक्त प्रमाणे | ४ | ७९ | ५८०.०० पैकी १९३.३३ क्षेत्राबाबत |

वरील मिळकतीपैकी **आमचे अशिल श्री. मच्छिंद्रनाथ नारायण धुमाळ यांच्या मालकीच्या १९३.३३ चौ.मी. निरतुटक असलेल्या हिस्याबाबतचे बक्षीसपत्र**

तरी सदरहू मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, वा तत्सम कोणतेही दावे मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबधीतांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तकार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून आमचे अशील सदर बक्षीसपत्र पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी. व सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

**पनवेल,**
**दिनांक : २०/०५/२०२२**

**पत्ता :– शॉप नं १३०, मुन्सीपल शॉपिंग कॉम्प्लेक्स, पहिला मजला, भाजी मार्केटजवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६.**

**सही/–**
**निलेश द. हातमोडे**
**ॲडव्होकेट**
**मो.नं. ८१०८५५८२८९**

## E-Tender Notice

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors / agencies on Mahatransco E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following work.

**Tender No.: EE/400kV/RS(O&M)/DN/KHR/Ten-4/22-23 (RFX No. 7000023218)**

**Period for submission of E-Bid: 20.05.2022 to 27.05.2022 up to 23:59 hrs**

**Name of Work : Providing and Fixing of Electrical Insulating, Acid & Alkali Proof Mats and Painting of floor by Self level epoxy coating at 400kV RS, Kharghar**

| Estimated Cost | EMD (Rs) | Tender Fee (Rs) | Closing Date | Technical Opening Date | Commercial Opening Date |
|---|---|---|---|---|---|
| Rs. 9,34,622.1/- (Including GST) | Rs. 9346.22/- | Rs.500/- + GST | **27.05.2022** up to 23:59 hrs | **28.05.2022** at 10:00 hrs (If possible) | **28.05.2022** at 10:15 hrs (If possible) |

**Contact Persons:**
1) Mr. S.O.Katkar, Executive Engineer, 400kV RS O&M Dn., Kharghar, 7666127972
2) Ms. P.C.Deshpande, Dy.EE (O), 400kV RS O&M Dn., Kharghar, 9819313988
For further details visit our website **www.mahatransco.in**

1] Tender document can be downloaded by only online from aforesaid website.
2] Eligible contractor should submit their Bid well in advance instead of waiting till last date.

**MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems.**

**Note :- All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tendering portal (New) - https://srmetender.mahatransco.in.**

**Sd/-**
**Executive Engineer,**
**400kV R.S. (O&M) Dn., Kharghar**

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमीन मिळकत कब्जेदार सदरी नाव असलेल्या जमीन मिळकतीचे मालक/ कब्जेदार **१) श्री. जनार्दन दिनकर कदम व २) श्री. प्रदिप जनार्दन कदम** हे खरेदी/विक्री करण्याचा व्यवहार आमचे अशिल यांच्याशी करणार आहेत.

**जमीन मिळकतीचे वर्णन**

**मौजे – उतेखोल, ता. माणगाव, जि. रायगड येथील**

| मालकाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| उतेखोल | ६२ अ/१७ | ०–०८–०० यापैकी १) श्री. जनार्दन दिनकर कदम व २) श्री. प्रदिप जनार्दन कदम यांच्या हिश्याचे क्षेत्र ०–०१–०५ | ०–०४ |

**उपरोक्त वर्णनीत (०–०१–०५) या जागेमध्ये बांधलेल्या मालमत्तेचे वर्णन पुढीलप्रमाणे :**

| नगरपंचायत | मालमत्ता क्र. | मालमत्तेचे वर्णन | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| माणगाव | २२३४ | घराची लांबी रुंदी ३७.८ x २२.७ आर.सी.सी. बांधकाम तळमजला व पहिला मजला असे | ८५८ चौ.फुट |

तरी वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीच्या कोणताही गहाण, दान, बक्षीस, खरेदी साठेकरार, मिळकत विकसीत करण्याबाबतचा करार, कुळ हक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, बोजा, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध दिवाणी दावा महसूली वाद असल्यास त्यांच्या लेखी हरकती त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्कांबाबत प्रथम दर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे तसेच त्यांच्या पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे हरकत मुदतीत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत आहे. असे समजून वर नमूद केलेले जमिन मिळकतीचे मालक **१) श्री. जनार्दन दिनकर कदम व २) श्री. प्रदिप जनार्दन कदम हे व्यवहार आमचे अशिल** यांच्याशी कायदेशीर महसूल कायद्याप्रमाणे कायदेशीर बाबींची पूर्तता करून व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक :– १९/०५/२०२२**

**सही/–**
**ॲड. शुभांगी केदार लाड**
MAH/4524/2018 B.A.,LL.B.
**ऑफीस : शॉप नं. २, इंदिरा अंजली को. ऑप.सो., जुन्या पोस्ट ऑफीसजवळ, पनवेल, रायगड.**
**मो. : ९८३३८६८८६९/९३२४४१६१०५**
Email : shubhangilad18@gmail.com

# दिव्यांगांना महिनाभरात मिळणार स्टॉल

## कार्यवाही गतिमान करण्याचे नवी मुंबई आयुक्तांचे अधिकाऱ्यांना निर्देश

**नवी मुंबई : बातमीदार**

दिव्यांगांच्या सक्षमीकरणाकरिता त्यांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी स्टॉल देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. याकरिता दिव्यांगांकडून अर्ज मागविण्यात आलेले आहेत. या दिव्यांगांच्या स्टॉलकरिता सिडकोकडे जागेची मागणी करण्यात आली असून १४ भूखंड हस्तांतरित करण्याबाबतची कार्यवाही झालेली आहे. या अनुषंगाने सदर कामाला गती देऊन दिव्यांग व्यक्तींना लवकरात लवकर स्टॉल उपलब्ध करून देण्याकरिता महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी मालमत्ता विभागाची बैठक घेत आगामी एका महिन्याच्या कालावधीत याबाबतची कार्यवाही जलद गतीने पूर्ण करावी, असे आदेश दिले.

दिव्यांग व्यक्तींना मुख्य प्रवाहात आणून त्यांच्या सक्षमीकरणासाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने विविध योजना, उपक्रम राबविले जात आहेत. वाशी येथील महानगरपालिकेचे ईटीसी अपंग शिक्षण प्रशिक्षण व सेवासुविधा केंद्र हे एकाच छताखाली विविध प्रकारच्या दिव्यांगांना शिक्षण प्रशिक्षण व सेवासुविधा उपलब्ध करून देणारे देशातील अग्रगण्य केंद्र आहे.

स्थापत्य विभागानेही त्यानुसार सिडकोने हस्तांतरित केलेल्या भूखंडांचा वापरासाठी योग्य प्रकारे विकास करण्याची कामे समांतरपणे एक महिन्याच्या कालावधीत पूर्ण करावीत असे निर्देश आयुक्तांनी दिले. स्टॉलची निर्मिती करतानाही दिव्यांगांच्या दृष्टीने विचार करून सुविधा उपलब्ध करून द्याव्यात असेही आयुक्तांनी निर्देशित केले.





स्टॉलमध्ये दिव्यांगांना ये-जा करण्यासाठी रॅम्पची व्यवस्था योग्यरितीने असावी याकडे विशेष लक्ष देण्याच्या सूचना आयुक्तांनी केल्या. त्याचप्रमाणे या कामासाठी भूखंड विकसित करताना तेथे आवश्यक सुविधांची पूर्तता करावी आणि दिव्यांगांना वापर करणे सुलभ होईल अशाप्रकारे प्रसाधनगृहांची व्यवस्था असण्याची काळजी घेण्यात यावी असेही आयुक्तांनी निर्देशित केले.

सदर १४ भूखंडांची पाहणी संबंधीत विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी यांनी कार्यकारी अभियंता यांच्यासमवेत करावी, असे सूचित करतानाच आयुक्तांनी काही भूखंडांना मालमत्ता विभागाचे उपायुक्त आणि शहर अभियंता यांनीही संयुक्तपणे भेट देऊन पाहणी करावी, असे निर्देशित केले. आगामी एक महिन्यात सदर भूखंडांचा वापरण्यायोग्य विकास करण्याचे निर्देश अभियांत्रिकी विभागाला देतानाच आयुक्तांनी स्टॉल निर्मिती व दिव्यांग सूची बाबतची कार्यवाही सुरू करण्याचे निर्देश दिले. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त संजय काकडे, शहर अभियंता संजय देसाई, मालमत्ता विभागाचे उपायुक्त जयदीप पवार उपस्थित होते.

**नवी मुंबई महानगरपालिका दिव्यांगांना स्वयंरोजगारासाठी स्टॉल उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक आहे. ही कार्यवाही जलद होण्याच्या दृष्टीने नियोजनबद्धरित्या हे काम पूर्ण करण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिका प्रयत्नशील आहे.**

**-अभिजित बांगर, आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका**

# उसर्ली खुर्दचे माजी सरपंच विश्वास भगत, प्रमिला भगत यांच्यावर गुन्हा दाखल करा

## राजिप सीईओंच्या आदेशान्वये बीडीओंची पनवेल पोलिसांत तक्रार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील उसर्ली खुर्द ग्रामपंचायत हद्दीत इमारत बांधकामांना बोगस परवाना देऊन नागरिकांची फसवणूक आणि शासनाचा महसूल बुडविल्याप्रकरणी माजी सरपंच विश्वास लक्ष्मण भगत आणि प्रमिला मोहन भगत यांच्यावर गुन्हा दाखल करावा, असे आदेश रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी पनवेल पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय भोये यांना दिले आहेत. या संदर्भात श्री. भोये यांनी दिलेल्या निर्देशानुसार ग्रामसेवकाने माजी सरपंच विश्वास भगत आणि प्रमिला भगत यांच्यावर गुन्हा दाखल करण्यासाठी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज दिला आहे.

राज्य शासनाने पनवेल, उरण तालुक्यातील सुमारे १९५ गावांमध्ये १० जानेवारी २०१३पासून नैना (सिडको) विकास प्राधिकरण लागू केले आहे. या अंतर्गत उसर्ली खुर्द ग्रामपंचायत परिसरही येतो. नैना अस्तित्वात आल्यानंतर बांधकाम परवानगी देण्याचा अधिकार नैनाकडे आला. असे असताना माजी सरपंच विश्वास भगत यांनी बिल्डर्सशी संगनमत करून अंदाजे ७० ते ८० इमारतींना स्वतःच्या सही, शिक्क्याने नैना विकास प्राधिकरण येण्यापूर्वी म्हणजेच १० जानेवारी पूर्वीच्या तारखा टाकून ग्रामपंचायतीचा बोगस इमारत बांधकाम परवाना दिला आहे. त्याआधारे इमारतींचे बांधकाम पूर्ण होऊन नागरिक तेथे रहावयास आलेले आहेत, मात्र ही बांधकामे बेकायदेशीर असल्याने नैना प्राधिकरणाने ती बेकायदेशीर ठरवली आहेत.

या संदर्भात उसर्ली खुर्द ग्रामस्थांनी केलेल्या तक्रारीवरून जि. प.च्या सीईओंनी चौकशी केली असता त्यात तत्कालीन सरपंच विश्वास भगत दोषी आढळले. त्यामुळे सीईओंनी शासन निर्णयानुसार सरपंच विश्वास भगत यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश पनवेलच्या गटविकास अधिकाऱ्यांना दिले होते, मात्र कारवाईस टाळाटाळ झाली. म्हणून ग्रामस्थांनी उपोषणाचा इशारा दिला होता. त्यामुळे अखेर बीडीओंनी ग्रामसेवकामार्फत पनवेल शहर पोलीस ठाण्यात माजी सरपंच विश्वास भगत आणि प्रमिला भगत यांच्याविरोधात तक्रार दाखल केली आहे.

या कारवाईमुळे नैना परिसरातील बेकायदेशीर बांधकामे करणाऱ्या अनेक बिल्डर्सना चाप बसणार आहे, तर नागरिकांची दिवसेंदिवस होणाऱ्या फसवणुकीपासून सुटका होणार आहे, असे ग्रामस्थांनी सांगितले.

# उरण शहरात गॅस शवदाहिनीचे भूमिपूजन

**उरण : वार्ताहर**

उरण शहराच्या हद्दीत नगर परिषदेच्या पुढाकाराने बोरी स्मशानभूमी येथे मुख्याधिकारी संतोष माळी यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. २०) गॅस शवदाहिनीचे भूमिपूजन करण्यात आले.

या वेळी नगर परिषद अभियंता झुंबर माने, आरोग्य निरीक्षक हरेश तेजी, मेसर्स चिरंतन उद्योगचे विशाल केणी, नगर परिषदेचे कर्मचारी उपस्थित होते. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोस्थान महाअभियान (जिल्हास्तर) या योजनेंतर्गत उरण नगर परिषदेने पाठपुरावा केला होता. त्याला यश आले असून या कामासाठी सुमारे ९४ लाख ७९ हजार १८२ रुपये मंजूर झाले आहेत. या रकमेतून गॅस शवदाहिनी आस्थापित करणे, शवदाहिनी हॉल व शेडचे काम करण्यात येणार आहे. कार्यादेश दिल्यापासून १५० दिवसांत पूर्ण करण्यात येणार आहे, अशी माहिती उरण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी संतोष माळी यांनी दिली.



# रोडपाली जंक्शनवर वाहतूक कोंडीने प्रवासी हैराण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंब्रा-पनवेल महामार्गावरील नावडे या ठिकाणी उड्डाणपूल नुकताच खुला करण्यात आला आहे. यामुळे या परिसरातील वाहतूक कोंडी काही प्रमाणात सुटली आहे, मात्र रोडपाली जंक्शनवर आता वाहतूक कोंडीचा नवा प्रश्न निर्माण झाला आहे. या ठिकाणी वाहनांना बराच वेळ ताटकळत राहावे लागत आहे.

सध्या रोडपाली जंक्शन येथे फूडलँड कंपनीसमोर लोखंड पोलाद बाजारात जाण्यासाठी एक मार्गिका ठेवण्यात आली आहे. याच मार्गिकेचा वापर थेट कळंबोली सिग्नल येथे जलदगतीने पोहचण्यासाठी केला जातो, तसेच फूडलँड उड्डाणपुलावर वाहने कोंडीत अडकल्याचे पाहून विरुद्ध दिशेने पुलावरून प्रवास करून थेट रोडपाली जंक्शनपर्यंत पोहचण्यासाठी बेकायदा प्रवास करीत आहेत. यामुळे येथील वाहतूक कोंडीत भर पडली आहे.



रोडपाली जंक्शन येथे नवी मुंबई पोलीस मुख्यालयाच्या मार्गावरून येणारी वाहनांची संख्या वाढली आहे. जेएनपीएकडे जाणाऱ्या सिग्नलची वेळ ८० सेकंदाची आहे. यावेळेत १५ ते १६ अवजड वाहने जाऊ शकतात. नावडे व रोडपाली येथून वाहने आल्यास त्यांना कळंबोली सिग्नलवर अजून काही वेळ थांबावे लागत आहे. रोडपाली सिग्नलवर सर्वाधिक कोंडीचे कारण हे मुंबईकडून पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या अवजड वाहनांमुळे ही समस्या वाढली आहे. टोलनाका चुकविण्यासाठी ही वाहने शीव- पनवेल महामार्गावरून रोडपाली जंक्शन येथून थेट पुण्याकडे जाणाऱ्या द्रुतगती मार्गावर चढण्यासाठी याच मार्गाचा वापर करतात.

मुंब्रा-पनवेल महामार्गावरील तळोजा नोडमधील १०२ आरएएफ कँपसमोरील सिग्नल, नावडे फाटा, रोडपाली सिग्नल व कळंबोली सर्कल ही मुख्य वाहतूक कोंडीची ठिकाणे बनली आहेत.

**नावडे येथील उड्डाणपूल वाहनांसाठी खुला झाल्याने रोडपाली सिग्नलवरील वाहतुकीचा ताण अजून वाढला आहे, हे खरे असले तरी येथे वाहतूक पोलीस कर्मचारी सदैव तत्पर असतात. रोडपाली जंक्शन येथे दिवसा पाच पोलीस कर्मचाऱ्यांची नेमणूक केली आहे.**

**-निशिकांत विश्वकार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कळंबोली वाहतूक विभाग**

# उरणमध्ये उन्हाळी शिबिरातून मुलांनी दिला विश्वहिताचा संदेश

**उरण : वार्ताहर**

रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयांअंतर्गत उरण येथे १२ ते २१ मेदरम्यान सुरू असलेल्या उन्हाळी प्रशिक्षण शिबिरामध्ये शुक्रवारी (दि. २०) द्रोणागिरी डोंगरावर ट्रेकिंगचा कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी सर्व पालक व विद्यार्थ्यांनी सर्वांना पोस्टरद्वारे विश्वहिताचा महत्त्वपूर्ण संदेश दिला.

प्रत्येकाने रोजचा दिनचर्येमध्ये प्लास्टिकचा वापर टाळणे हे खूप गरजेचे आहे, प्राणी व पर्यावरण हिताचे आहे, असे मार्गदर्शन या वेळी उपस्थित मान्यवरांनी केले. रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक व सचिन निकम यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा शिक्षक व सेव्हेन स्टार फुटबॉल अकॅडेमी उरणचे प्रशिक्षक प्रवीण तोगर, नंदिनी प्रवीण तोगरे व विद्यार्थी व पालकांनी मिळून द्रोणागिरी डोंगरावर साफसफाई अभियानही राबविले.



# पनवेल रेल्वे स्टेशन कन्सलटेटीव्ह कमिटीची बैठक

**पनवेल : वार्ताहर**

स्टेशन कन्सलटेटीव्ह कमिटीची बैठक गुरुवारी (दि. २०) पनवेल रेल्वे स्टेशन येथील प्रबंधक जे. पी. मीना यांच्या दालनात झाली. या वेळी विविध विषयांवर चर्चा झाली.



या बैठकीत पनवेल प्रवासी संघाचे अध्यक्ष तथा कन्सलटेटीव्ह कमिटी सदस्य डॉ. भक्तीकुमार दवे यांनी आगामी काळात येऊ घातलेल्या डीएफसी प्रकल्पामुळे आपल्याला आपल्या आंदोलनांची आणि मार्गक्रमणाची दिशा निश्चिती करणे गरजेचे असल्याचे सांगितले. या वेळी स्थानक परिसरातील दुरवस्था झालेल्या रस्त्यांचा प्रश्न ऐरणीवर आला. याबाबत संयुक्तपणे भूमीपरीक्षण करून त्या त्या आस्थापनांना अधिकार असलेल्या जागा निश्चिती करावीच लागेल, अशी भूमिका मांडण्यात आली. अस्वच्छता, वाहतुकीचा बोजवारा, दुचाकी तसेच चारचाकी वाहनांच्या पार्किंगचा प्रश्न, प्रवासी शुल्क पूर्ववत करणे, सबवे पनवेलच्या पूर्व स्थानक दिशेला उघडण्याचे काम जलद गतीने करणे, चिखले गावाकडे जाणाऱ्या रस्त्याची रेल्वे पुलामुळे झालेली दूरवस्था दूर करणे, सोमाटणे रेल्वेस्थानकावर जाण्यासाठी रस्त्याची तरतूद करणे अशा समस्यांकडे रेल्वे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले.

या बैठकीसाठी कमर्शियल स्टेशन मास्तर सुधीर कुमार, प्रवासी संघाचे कार्यवाह आणि सबर्बन रेल्वे युजर्स कन्सलटेटीव्ह कमिटी सदस्य श्रीकांत बापट, उपाध्यक्ष यशवंत ठाकरे, सहकार्यवाह निलेश जोशी, झोनल रेल्वे युजर्स कन्सलटेटीव्ह कमिटीचे सदस्य अभिजित पाटील, मंदार दोंदे, विलास दातार, मधुकर आपटे, रमेश जानोरकर, संतोष पाटील, सुनील रानडे, सरिता पाटणकर, माजी स्टेशन मास्तर डी. के. गुप्ता, गौतम अगरवाल उपस्थित होते.

# उरण चारफाटा रस्ता रुंदीकरणाला अखेर सुरुवात

**उरण : रामप्रहर वृत्त**

शहरातील मुख्य मार्ग असलेल्या चारफाटा येथील रस्ता नादुरुस्त झाल्याने उरणमधील वाहनचालकांना धूळ, खड्डे तसेच वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत होते. याची दखल घेत सिडकोकडून रस्त्याच्या रुंदीकरणाच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे.

या रस्त्याचे काम रखडल्याने दररोज नागरिकांना प्रचंड वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे. मंगळवारपासून चारफाटाच्या रस्त्याच्या रुंदीकरणाच्या कामाला सिडकोकडून सुरुवात करण्यात आली आहे. त्यामुळे ओएनजीसी, करंजा तसेच शहरात ये -जा करणाऱ्या प्रवासी व नागरिकांना याचा फायदा होणार आहे.

# पामबीच मार्गावरील वृक्षतोडीवरील हरकतींना २० जूनपर्यंत मुदतवाढ

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पामबीच मार्गावरील अरेंजा कॉर्नर ते कोपरी गावादरम्यातची ३९० झाडे महापालिकेतर्फे तोडली जाणार आहेत. या वृक्षतोडीवर घेण्यात येणाऱ्या हरकती व सूचनांच्या मुदतीला महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी मुदतवाढ दिली आहे. याबाबत २० जूनपर्यंत पर्यावरणवाद्यांना हरकत घेता येणार आहे.

महापालिकेतर्फे पामबीच मार्गावर वाशीतील महात्मा फुले चौक ते कोपरी गावापर्यंत उड्डाणपूल उभारण्यात येणार आहे, परंतु या प्रकल्पाला सुरुवात करण्याआधी रस्त्याच्या दुभाजकांमधील तब्बल ३९० झाडे काढावी लागणार आहे. महापालिकेने केलेल्या सर्वेक्षणाप्रमाणे काही झाडे तोडली जाणार आहेत, तर काहींचे स्थलांतर केले जाणार आहेत. त्याकरीता महापालिकेच्या वृक्षप्राधिकरण समितीतर्फे मागील आठवड्यात हरकती व सूचना देण्याबाबत आवाहन करण्यात आले होते, मात्र याबाबत अनेक पर्यावरणवादी अनभिज्ञ होते, तसेच भाजपचे युवा नेते राहुल शिंदे यांनी ही झाडे काढण्यास तीव्र विरोध केला. अखेर अभिजित बांगर यांनी हरकती व सूचना घेण्याच्या अंतिम मुदतीला २० जूनपर्यंत वेळ वाढवून दिली आहे. त्यामुळे आता अनेक पर्यावरणवाद्यांना या प्रकरणी प्रशासनाकडे हरकती व सूचना नोंदवता येणार आहेत.

# मालमत्ता कर भरणाऱ्यांसाठी पनवेल पालिकेची प्रोत्साहनपर योजना

## सहा लाखांचा अपघात विमा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मांडणार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापालिका प्रशासन मालमत्ता कर भरणाऱ्यांना सहा लाखांचा अपघात विमा देण्याचे ठरवले आहे. तसा ठराव केला असून मंगळवारी (दि. २१) होणाऱ्या सर्वसाधारण सभेत मंजुरीसाठी ठेवण्यात येणार आहे.

पनवेल महापालिकेने शहरातील मालमत्ताधारकांच्या सुरक्षेसाठी दोन कोटी रुपये खर्च करून ही अपघात विमा योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या विमा योजनेचा लाभ तीन लाख मालमत्ताधारक व त्यांचे कुटुंबीय अशा सुमारे १२ लाख नागरिकांना होणार आहे. विशेष म्हणजे जे मालमत्ताधारक कर भरतात त्या सर्वांना या योजनेचा मोफत लाभ उचलता येणार आहे. ही योजना लागू झाल्यानंतर मालमत्ताधारक पती, पत्नीचा अपघाती मृत्यू झाल्यास वारसांना सहा लाखांचा विम्याचा लाभ मिळणार आहे.



संबंधित योजनेमध्ये कुटुंबाच्या व्याख्येमध्ये पती, पत्नी, ३० वर्षे वयांची दोन मुले (अविवाहित मुलीच्या वयाची मर्यादा नाही), आई-वडील, अपंग मुले (अविवाहित) यांचा समावेश आहे. पालिका क्षेत्रात एकापेक्षा अधिक मालमत्ता असल्या तरीही एकच मालमत्ता गृहीत धरून लाभ दिला जाईल. मालमत्ताधारकांच्या दोन अपत्यांपैकी एकाचा किंवा पालकांचा अपघाती मृत्यू झाल्यास तीन लाख रुपयांची विम्याची रक्कम मिळेल.

आयुक्त गणेश देशमुख यांनी सांगितले की, आपण जो मालमत्ता कर गोळा करतो, तो जनतेला सेवासुविधा उपलब्ध करण्यासाठी. अपघात विमा योजना हा त्याचाच एक भाग आहे. या योजनेचा नागरिकांवर कोणताही भार येणार नसून पालिका प्रशासन याचा प्रीमियम भरणार आहे. नागरिकांच्या कल्याणासाठी ही योजना राबविण्यात येणार आहे.

### *असा मिळणार लाभ*

*या विमा योजनेमध्ये कुटुंबातील व्यक्तीला कुठल्याही प्रकारचा अपघात झाल्यास कुटुंबातील सर्वांना मिळून किंवा एका व्यक्तीला एका वर्षांमध्ये दवाखान्यातील जास्तीत जास्त सव्वा लाख रुपयांचा वैद्यकीय खर्च मिळणार आहे. तातडीच्या वैद्यकीय खर्चात रुग्णवाहिकेचा वापर झाल्यास पाच हजार रुपये खर्च मिळू शकणार आहे. अपघातादरम्यान पूर्णत: कायमस्वरूपी अपंगत्व आल्यास ६ लाख रुपये संबंधित कुटुंबातील व्यक्तीला मिळू शकतील, मात्र लाभ मिळण्यासाठी मालमत्ताधारकांना थकीत मालमत्ता कर भरावा लागणार आहे.*





**पनवेल : गायत्री परिवार ट्रस्ट व सेक्टर ८ अपार्टमेंट असोसिएशन यांच्यामार्फत उलवे नोड सेक्टर ८ येथे गुरुवारी गायत्री पठणाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे दीप प्रज्ज्वलन गव्हाण ग्रामपंचायत उपसरपंच विजय घरत, भाजपचे कोपर अध्यक्ष सुधीर ठाकूर व भाजप कामगार अध्यक्ष किशोर पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी विलास साळवे, बबन मरसाळ, व्ही. व्ही. रेड्डी, सोनी व इतर पदाधिकारी उपस्थित होते.**

# खालापुरात काही शिवभोजन केंद्र नामधारी

## तपासणी करण्याची आवश्यकता

(छाया : विनायक माडपे)



**खोपोली : प्रतिनिधी**

गरीब व कष्टकऱ्यांना किमान एक वेळ पोटभर जेवण मिळावे, या उद्देशाने राज्य सरकाने शिवभोजन थाळी योजना सुरू केली खरी, मात्र काही केंद्राचा अपवाद वगळता अनेक केंद्रात थाळी रिकामी असूनही, केंद्र चालकांचे पोट मात्र भरत आहे. त्यामुळे शिवभोजन थाळी केंद्रांच्या तपासणीची आवश्यकता निर्माण झाली आहे.

राज्य सरकाने २०२० मध्ये शिवभोजन थाळी योजना सुरू केली आहे. गरीब व गरजूंना शिवभोजन थाळी योजनेमुळे किमान एक वेळच्या जेवणाची सोय व्हावी, हा हेतू आहे. अवघ्या दहा रुपयात पोटभर जेवण यामुळे शिवभोजन थाळी केंद्राबाहेर रांगा लागतात. डाळ, भात, दोन चपात्या आणि भाजी यामुळे भरपेट जेवण मिळते.

शहर, किंवा तालुक्याच्या ठिकाणी तसेच रुग्णालयानजीक, बसस्थानके, शासकीय कार्यालये, बाजारपेठेची ठिकाणे या ठिकाणी ही शिवभोजन थाळी केंद्रे सुरू करण्यात आली. शिवभोजन थाळी घेताना आधारकार्ड क्रमांक नमूद करून त्याचा फोटो घेतला जातो. परंतु काही ठिकाणी भोजन थाळी ऐवजी थंडगार पाण्याची बाटली तर काही ठिकाणी वडापाव देवून फोटो घेतले जातात. केवळ फोटोसाठी काही केंद्र चालकांनी लाभार्थी तयार केले आहेत. त्यामुळे शासनाची मोठ्या प्रमाणात फसवणूक होत असून, पुरवठा विभागाने शिवभोजन केंद्रावर प्रत्यक्ष भेट देवून सत्य परिस्थिती तपासणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक शिवभोजन थाळी केंद्रावर सीसी टीव्ही कॅमेरे लावण्याची गरज आहे, असे अनेक जणांनी सांगितले.

शिवभोजन केंद्राच्या ठिकाणी सीसीटिव्ही आवश्यक असताना अनेकांनी ते बसवले नाहीत. ग्रामीण भागात अनेक तक्रारी असून पुरवठा विभागाचे लागेबांधे असल्याचे अनेक जण सांगतात. खालापूर तालुक्यात १५ शिवभोजन केंद्र असून प्रामाणिकपणे केंद्र चालविणाऱ्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. ग्रामीण भागातील केंद्र चालकांना एका थाळीमागे शासन पंचवीस रुपये देते तर शहरी भागासाठी पन्नास रुपये दिले जातात. तीन-तीन महिने केंद्र चालकांना शासनाकडून बिलाची रक्कम मिळत नसून गेल्या काही महिन्यात तेल, भाजी वाढलेले दर यामुळे केंद्र चालक मेटाकुटीला आले आहेत.

## महाडमध्ये फसवणूकप्रकरणी बिल्डरवर गुन्हा दाखल

**महाड : प्रतिनिधी**

लाखो रुपये घेऊनदेखील सदनिकेचा ताबा न दिल्याने ग्राहकाने महाड शहर पोलीस ठाण्यात तक्रार करताच बांधकाम व्यवसायिकाविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणी सदर बांधकाम व्यवसायिकास अटक करण्यात आली आहे.




पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार शहरातील कोटेश्वरी तळे परिसरातील सर्व्हे नंबर १६२४, १६२५, १६२६ ही मिळकत बांधकाम व्यवसायिक योगेश कळमकर विकसित करण्यासाठी घेतली आहे. या जागेत उभ्या राहणाऱ्या योग सुशीला अपार्टमेंटमध्ये चंदा गोविंद कुडपाने (वय ६५, रा. सुंदरवाडी महाड) या ज्येष्ठ महिलेस सदनिका खरेदी करायची होती. त्याकरिता पैसे दिले असता २०२० पर्यंत सदनिकेचा ताबा दिला जाईल असे विकासकाने सांगितले. दरम्यान, या व्यवहारापोटी बांधकाम व्यवसायीक योगेश कळमकर (रा. महाड) याने चंदा कुडपाने यांच्याकडून ५४ लाख २५ हजार १०० रुपये घेतले. मात्र सदनिकेचा ताबा न दिल्याने आपली आर्थिक फसवणूक झाल्याचे लक्षात येताच चंदा कुडपाने यांनी बांधकाम व्यवसायीक योगेश कळमकर याच्याविरोधात महाड शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार योगेश कळमकर याच्याविरोधात भादवि कलम ४२०, ४०६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला अटक करण्यात आली असल्याची माहिती तपासिक अमलदार विशाल शिंदे यांनी दिली.

## सौरऊर्जेवरील शीतपेट्यांद्वारे मच्छीमार महिलांना मिळणार आर्थिक बळ

### ‘देवीदयाल’तर्फे छोट्या व्यावसायिकांना १०० शीतपेट्या उपलब्ध



(छाया : धम्मशील सावंत)

**पाली : प्रतिनिधी**

घरातून अथवा छोट्या दुकानातून मत्स्य विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या महिलांना सौरऊर्जेवर चालणाऱ्या १०० शितपेट्या उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. भारत सरकारच्या निर्देशाप्रमाणे अक्षय ऊर्जा क्षेत्रात काम करणाऱ्या देवीदयाल सोलर सोल्युशन आणि विल्प्रो इनोव्हेशन फाऊंडेशन यांच्या सहकार्याने रत्नागिरी येथील नवीन प्रकल्पामार्फत मत्स्य विक्री करणाऱ्या महिलांना या शितपेट्या अनुदान तत्वावर उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यामुळे मच्छी विक्रेत्या महिलांना महिन्याकाठी किमान पाच हजार रुपये अधिकचे उत्पन्न मिळू शकणार आहे, अशी माहिती देवीदयाल सोलरचे संस्थापक तुषार देवीदयाल यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

या उपक्रमा अंतर्गत कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबातील १०० महिला लाभार्थींना ८० टक्के अनुदानावर सौर शीतपेट्या मिळणार आहेत. देवीदयाल सौर उत्पादन चोवीस तास सौरऊर्जेवर चालते. त्यामुळे बर्फ व वीजेचा खर्च वाचणार असून लाभार्थी महिला त्यांचे मासे खराब होण्यापासून वाचवू शकणार आहेत.

## बिरवाडी ग्रामपंचायतीविरोधात दिव्यांगांचा एल्गार

### महाड पंचायत समिती कार्यालयासमोर आंदोलन



(छाया : महेश शिंदे)

**महाड : प्रतिनिधी**

तालुक्यातील अपंगांना शासकिय निधी व योजनांचा लाभ मिळावा, यासाठी गेल्या सहा महिन्यापासून प्रहार अपंग क्रांती संस्थेच्या वतीने पाठपुरावा सुरू असून त्यांना त्यांचा लाभ मिळत नसल्याने प्रहार संघटनेतील दिव्यांग बांधवांनी शुक्रवारी (दि. २०) महाड पंचायत समितीवर आंदोलन करत बिरवाडी ग्रामपंचायतीच्या कारभाराविरोधात संताप व्यक्त केला.

बिरवाडी ग्रामपंचायतीच्या कारभाराविरोधात प्रहार अपंग क्रांती संस्थेतर्फे महाड पंचायत समिती कार्यालयावर शुक्रवारी मोर्चा काढण्यात आला होता. दिव्यांगांना शासकीय निधी व योजनेचा लाभ मिळवून देताना ग्रामपंचायत विभाग चालढकल करत असल्याने अपंगापर्यंत विविध योजना व निधी पोचत नसल्याचे सांगून हा धडक मोर्चा काढण्यात आला. संस्थेचे कोकण प्रांत अध्यक्ष सुरेश मोकल, मुंबई जिल्हा अध्यक्ष विशाल वाघमोडे, पनवेल तालुका उपाध्यक्ष प्रकाश पाटील, माणगांव तालुका अध्यक्ष पांचाळ, महाड तालुकाध्यक्ष फैज हुर्जुक यांच्यासह दिव्यांग बांधव या मोर्चात सहभागी झाले होते.

महाड तालुक्यातील बिरवाडी ग्रामपंचायत गेली कांही वर्ष दिव्यांगाना एकूण उत्पन्नातून देण्यात येणारा निधी देत नसल्याची तक्रार या वेळी करून सदर निधीत गैरव्यवहार झाला असल्याचा आरोप केला. यामुळे जोपर्यंत या निधीचा घानादेश मिळत नाही, तोपर्यंत आम्ही येथून हटणार नाही, अशी भूमिका फैज हुर्जुक आणि इतर पदाधिकाऱ्यांनी घेतली. पाच टक्के निधी तात्काळ देवून संबंधित ग्रामसेवकावर कारवाई करावी, अशी मागणीदेखील प्रहार संघटने मार्फत करण्यात आली. या वेळी विजय मोरे, रमा चौगले, रेश्मा मोरे, काकासाहेब सावरे, शिवाजी कांबळे, प्रकाश पाटील, राजेंद्र पांचाळ, भरत भुईर, मेहबूब अतार, सचिन सुतार, मोहसिन दरेखान, सनिल जंगम, इम्रान कोंडेकर, राजेंद्र शिंदे, इम्रान सावंत, धनंजय शिंदे, छाया पारदुले, मंजूषा साबळे, सबरीन ईसाने, आलिया धामणकर, शबनूर पटेल, आफरी आलेकर, मंगेश महाडीक, महेश सुतार, शशिकांत जाधव आदि उपस्थित होते.

## बदल्यांच्या आदेशाकडे शिक्षकांच्या नजरा; १५ जूनपर्यंत मिळणार आदेश

**अलिबाग : प्रतिनिधी**

कोविड संसर्गाच्या पार्श्वभूमीवर गेल्या दोन वर्षांपासून रखडलेल्या प्राथमिक शाळांमधील शिक्षकांच्या बदली प्रक्रियेसाठी धावपळ सुरू झाली आहे. तीन टप्प्यात या बदल्या होणार असून रायगड जिल्ह्यातील सुमारे २५ ते ३० टक्के शिक्षकांच्या बदल्या होतील, असा अंदाज आहे. त्यामुळे उन्हाळी सुटीवर गेलेले शिक्षक आणि त्यांच्या कुटुंबियांचे या बदली प्रक्रियेकडे लक्ष लागून राहिले आहे.

शिक्षकांच्या ऑनलाइन बदली प्रक्रियेसाठी ग्रामविकास विभागाने सॉफ्टवेअर तयार केले असून त्याची चाचणी अंतिम टप्प्यात आहे. ते लवकरच कार्यान्वीत होईल, असे सांगितले जाते. प्राथमिक शिक्षकांची बदली प्रक्रिया राबवण्याच्या दृष्टीने ग्रामविकास विभागाने राज्यातील सर्व जिल्हा परिषदांची बैठक व्हिडिओ कॉन्फरन्सव्दारे घेण्यात आली. या बैठकीला ग्रामविकास विभागाचे सचिव, उपसचिव, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, प्राथमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी उपस्थित होते. यात १२ विषयांवर प्रामुख्याने चर्चा झाली. सर्वसाधारण क्षेत्रात १० वर्षे आणि एकाच शाळेवर पाच वर्षे पूर्ण करणारे तसेच अवघड क्षेत्रात तीन वर्षे सेवा देणारे शिक्षक बदलीसाठी पात्र आहेत. यासह संवर्ग एकमधील दुर्धर आजाराने पीडित शिक्षक, गतीमंद मुलांचे मातापिता, पती-पत्नी एकत्रीकरण या प्रकारात मोडणारे शिक्षकदेखील बदलीसाठी पात्र आहेत.

शिक्षकांच्या बदल्यांसाठी युडायसनुसार शाळा व शिक्षकांची माहिती अद्यावत करणे, शिक्षकांचे रोस्टर अद्यावत करून त्याला विभागीय आयुक्तांची मंजुरी घेणे, अवघड क्षेत्रातील शाळा निश्चित करणे, शिक्षकांचे आधार अपडेट करणे, शिक्षकांचे समानीकरण करणे, न्यायालयाच्या आदेशानुसार शिक्षकांच्या नेमणूका करणे आदि बाबींचा या वेळी झालेल्या चर्चेत समावेश होता.

शिक्षकांच्या ऑनलाइन बदलीबाबतच्या २७ फेब्रुवारी २०१७ च्या शासन निर्णयानुसार २०१९ मध्ये राज्यात ६० टक्के शिक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. त्यानंतर कोविडमुळे बदली पक्रिया स्थगित करण्यात आली होती. यंदा पुन्हा बदली प्रक्रिया राबवण्यात येत आहे. यासंदर्भात नवीन निकष ठरवण्यासाठी बदली अभ्यास समितीची स्थापना करण्यात आली होती. या समितीने सर्व शिक्षक संघटना, लोकप्रतिनिधी, तज्ज्ञ, पालक यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर बदलीचे नवीन निकष निश्चित करण्यात आले आहेत. ७ एप्रिल २०२० ला नवीन बदली धोरण अंमलात आले. यात सुगम व दुर्गम क्षेत्राचे निकष ठरवण्यात आले. या बदलीसाठी ३१ मे ही पूर्वीची तारीख बदलून ती ३० जून ग्राह्य धरावी, अशी मागणी शिक्षक संघटनांनी लावून धरली होती, ती मान्य करण्यात आली.

शिक्षक बदली पक्रियेसाठी जिल्हा स्तरावरील प्रशिक्षण पूर्ण झाले असून गटशिक्षणाधिकारी स्तरावरील प्रशिक्षणाला लवकरच सुरूवात होणार आहे. या प्रक्रियेत सर्वच शिक्षकांना पोर्टलवर माहिती भरण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार यंदा रायगड जिल्ह्यात सहा हजार शिक्षक पोर्टलवर माहिती भरतील. जूनच्या पहिल्या आठवडयात प्रत्यक्ष बदली प्रक्रियेला सुरूवात होईल.

### तीन टप्प्यांत होणार बदल्या

*ही बदली प्रक्रिया एकूण तीन टप्प्यात पूर्ण केली जाणार आहे. पहिल्या टप्प्यात शिक्षकांनी आपली संपूर्ण माहिती (प्रोफाईल) पोर्टलवर भरावयाची आहे. त्यांना लॉगीनसाठी ओटीपी दिला जाईल. गटशिक्षणाधिकारी स्तरावर या माहितीची खात्री करूनच ती पार्टलवर अपडेट होईल. दुसऱ्या टप्प्यात शिक्षकांनी जिल्हा अंतर्गत किंवा आंतरजिल्हा बदलीसाठी संवर्गनिहाय माहिती भरावयाची आहे. त्यानंतर बदली प्रक्रियेचा तिसरा आणि महत्त्वाचा टप्पा सुरू होईल. या बदलीचे ठिकाण निश्चित होवून १५ जूनपर्यंत बदलीचे आदेश संबंधित शिक्षकांना प्राप्त होतील. कमीत कमी मानवी हस्तक्षेप आणि पारदर्शकता या निकषांवर ही बदली प्रक्रिया पूर्ण होणार असल्याचे शिक्षण विभागातर्फे सांगण्यात आले.*

**शिक्षकांच्या बदली प्रक्रियेबाबत शिक्षक संघटना समाधानी आहेत. जिल्हाअंतर्गत बदली प्रक्रिया राबवण्यापूर्वी आंतरजिल्हा बदली प्रक्रिया पूर्ण करावी. त्यात पती-पत्नी एकत्रीकरणाला प्राधान्य देण्यात यावे. मागील बदलीच्यावेळी कोकणातील जिल्हे आंतरजिल्हा बदली प्रक्रियेतून वगळण्यात आले होते. त्यांना प्राधान्याने स्थान द्यावे. मागीलवेळी बदली झालेल्या ज्या शिक्षकांना कार्यमुक्त करण्यात आले नव्हते, त्यांना सर्वप्रथम कार्यमुक्त करावे.**

**-राजेश सुर्वे, राज्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद (प्राथमिक)**

## हॅम रेडिओचा वापर आपत्ती काळात फायदेशीर -तहसीलदार मीनल दळवी



(छाया : महेंद्र खैरे)

**रेवदंडा : प्रतिनिधी**

आपत्ती काळात मोबाइल यंत्रणा बंद पडल्यास हॅम रेडिओचा वापर करून तातडीने आपत्ती व्यवस्थापन करता येते. त्यामुळे आपत्ती काळात हॅम रेडिओचा वापर फायदेशीर ठरतो, असे प्रतिपादन अलिबागच्या तहसीलदार मीनल दळवी यांनी येथे केले.

रायगडचा युवक फांउडेशनच्या वतीने आपत्ती व्यवस्थापन तज्ज्ञ जयपाल पाटील यांनी अलिबाग तहसील कार्यालयात हॅम रेडिओ वापराबाबत प्रात्यक्षिके सादर केली. त्यानंतर तहसीलदार दळवी बोलत होत्या. हॅम रेडिओचा वापर केल्यास वित्तहानी, मनुष्यहानी, आग, अपघात आदी घटना टाळता येतील, असे त्यांनी या वेळी सांगितले.

मीनल दळवी यांनी या वेळी तहसील कार्यालयातून हॅम रेडिओव्दारे अलिबाग समुद्र किनारावरील उपस्थितांशी संपर्क साधला. तसेच त्यांनी हॅम रेडिओव्दारे वायरमनला आदेश देताच सिव्हिल हॉस्पिटलसमोर रस्त्यात पडलेल्या वीजवाहिन्या दूर करण्यात आल्या. नायब तहसीलदार तथा आपत्ती व्यवस्थापन प्रमुख अजीत टोळकर, आपत्ती व्यवस्थापन तज्ज्ञ जयपाल पाटील, हॅम रेडिओ परवानाधारक सत्यम पाटील, मंगेश राऊत, प्रथमेश भगत, दिलिप बापट, वैभव भालकर यांनी हॅम रेडिओ प्रात्यक्षिकांत सहभाग घेतला.

नायब तहसीलदार राजेश नागे, विभागीय कार्यालयातील अधिकारी नम्रता भोयर, रायगडचा युवक फाउंडेशनचे अश्रफ घट्टे, पूजा पेडणेकर, सुरेश खडपे, पत्रकार धनजंय कवठेकर, महेश शेरमकर यांच्यासह तहसील कार्यालयातील कर्मचारी व नागरिक या वेळी उपस्थित होते.

## जेएसडब्ल्यू कंपनीत चोरीचे सत्र सुरूच

### दोन प्रकरणांत पाच जणांना अटक

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील डोलवी येथील जेएसडब्ल्यू कंपनीत चोरीचे सत्र सुरू असून दोन वेगवेगळ्या चोरी प्रकरणी पोलिसांनी पाच जणांना अटक केली आहे.

जेएसडब्ल्यू स्टिल कंपनीच्या युटीलीटी डिपार्टमेंटमधील उघड्या जागेवरून आरोपीने एकूण २८ हजार रुपये किंमतीची कॉपर धातूची केबल मंगळवारी चोरुन नेली. सदर गुन्ह्यातील आरोपी इसराईल इस्माईल खान व सौरभ जाधव यांना पोलिसांनी बुधवारी (दि. १८) मध्यरात्री अटक केली आहे. याबाबत वडखळ पोलीस ठाण्यात ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास उपनिरीक्षक अतुल मडके करीत आहेत.

दुसऱ्या प्रकरणात चालक सर्वेश वैभव कार्लेकर (रा. डोलवी, ता. पेण) व आदिप राम भोईर, रोशन भानुदास पाटील (रा. बोर्वे, ता. पेण) यांनी आपआपसात संगनमत करुन १७ मे रोजी सकाळी ७.१५ च्या सुमारास जेएसडब्ल्यू स्टिल कंपनीच्या पॉवर प्लान्टमधील उघड्या जागेवरून ओला कचरा पिकअप टेम्पो (एमएच-०६,बीडब्ल्यू-४२४२) मध्ये भरुन त्यात लोखंडी प्लेट चोरुन नेत होते. कंपनीच्या अलिबाग गेटवर सुरक्षा रक्षकाने पिकअप टेम्पो थांबविला असता सदर माल मिळून आला. या गुन्ह्यातील तीन आरोपींना बुधवारी मध्यरात्री अटक करण्यात आली आहे. याबाबत वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस नाईक समीर पवार करीत आहेत.

## गटार बांधकामाच्या वादातून पेण रोहिदासनगर येथे मारहाण



**पेण : प्रतिनिधी**

नगरपालिकेच्या गटाराच्या बांधकामातून वाद झाल्याने रोहिदास नगर येथे आरोपीने गुरूवारी (दि. १८) रात्री महिला फिर्यादी व त्यांच्या पतीला मारहाण केल्याची घटना घडली. याबाबत गुन्हा दाखल झाला आहे.

सम्रता दिनेश गायकवाड (वय ३०, रा. रोहिदास नगर, पेण) याचे पती दिनेश गायकवाड हे गुरूवारी (दि. १८) रात्री घराबाहेर ओटीवर बसले होते. त्यावेळी सम्रता यांनी नगरपालिकेला सांगितल्याने गटाराचे काम केले, असा गैरसमज करून घेवून आरोपी सोनू चंद्या गायकवाड (वय ४९, रा. बौध्दनगर ता. पेण) याने दिनेश गायकवाड यांना शिवीगाळी व धक्काबुक्की करण्यास सुरवात केली.

हे भांडण सोडविण्यासाठी गेलेल्या सम्रता यांच्या डोक्यात सोनू गायकवाड याने तेथे पडलेली लाकडी बॅट मारली. तसेच शिवीगाळी करून ठार मारण्याची धमकी दिली.

याबाबत पेण पोलीस ठाण्यात भादंवि कलम ३२४,३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार सतीश पाटील करीत आहेत.

आयपीएलचा रनसंग्राम आजचा सामना मुंबई वि. दिल्ली रात्री. ७.३० वा., मुंबई

# बंगळुरुचा गुजरातवर शानदार विजय

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये गुरुवारी झालेल्या 'करो या मरो'च्या लढतीत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने गुजरात टायटन्सवर आठ गडी राखून शानदार विजय मिळविला. या विजयासह बंगळुरू संघ गुणतालिकेत चौथ्या क्रमांकावर पोहचला असून या संघाच्या प्लेऑफमध्ये पोहचण्याच्या आशा कायम आहेत, तर दुसरीकडे बंगळुरू संघाचा विजय झाल्यानंतर पंजाब किंग्ज, सनरायझर्स हैदराबाद यांचे आव्हान संपुष्टात आले आहे तसेच दिल्लीला आपला पुढचा सामना कोणत्याही परिस्थिती जिंकावा लागणार आहे.

गुजरातने बंगळुरूसमोर विजयासाठी १६९ धावांचे लक्ष्य ठेवले होते. बंगळुरूने ही धावसंख्या आठ गडी राखून गाठली. बंगळुरूकडून सलामीला आलेल्या फॅफ डू प्लेसिस आणि विराट कोहली या जोडीने धमाकेदार खेळ केला. कोहलीने अर्धशतकी खेळी करीत ५४ चेंडूमध्ये आठ चौकार आणि दोन षटकार लगावत ७३ धावा केल्या, तर प्लेसिसने ३८ चेंडूंमध्ये पाच चौकार लगावत ४४ धावा केल्या. या जोडीने ११५ धावांची भागिदारी केली. प्लेसिस बाद झाल्यानंतर कोहलीला ग्लेम मॅक्सवेने साथ दिली. त्याने १८ चेंडूंमध्ये नाबाद ४० धावांची खेळी करीत संघाला विजय मिळवून दिला.



## हैदराबादचे आव्हान संपुष्टात

तत्पूर्वी नाणेफेक जिंकून गुजरातने फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, मात्र गुजरातचा हा निर्णय चुकीचा ठरला. संघाच्या २१ धावा झालेल्या असताना शुभमन गिल फक्त एक धाव करुन तंबुत परतला. त्यानंतर दुसऱ्या विकेटसाठी आलेला मॅथ्यू वेडदेखील आपली कमाल दाखवू शकला नाही. तो मॅक्सवेलच्या चेंडूवर १६ धावांवर पायचित झाला. सलामीला आलेल्या वृद्धीमान साहाने समाधानकारक खेळी करीत २२ चेंडूंमध्ये ३१ धावा केल्या.

गुजरातचा कर्णधार हार्दिक पांड्याने आपली जबाबदारी चोख बजावत ६२ धावांची नाबाद अर्धशतकी खेळी केली. त्याला डेविड मिलर (३४) आणि राशिद खान (१९ नाबाद) या दोघांनी साथ दिली. राहुल तेवातिया मैदानावर टिकू शकला नाही. त्याने अवघ्या दोन धावा केल्या. शेवटी गुजरातने २० षटकांत १६८ धावा केल्या होत्या.

# राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत नवी मुंबईतील खेळाडू चमकले

**नवी मुंबई : बातमीदार**

अहमदनगर येथे नुकत्याच झालेल्या राज्यस्तरीय किक बॉक्सिंग स्पर्धेत नवी मुंबईतील खेळाडूंनी सुयश प्राप्त केले आहे. सुमारे ३६ जिल्ह्यांचे १५००पेक्षा जास्त कराटेपटू या स्पर्धेत सहभागी झाले होते.

स्पर्धेत नवी मुंबईमधील भारती विद्यापीठ शाळेतील यशांजली खरात हिने १८ वर्ष व ६८ किलो या गटात रौप्यपदक आणि अँकरवाला शाळेतील विद्यार्थी देवांश पवार याने सात वर्ष व १७ किलो गटात कांस्यपदक मिळवले. त्यांना प्रमुख शिक्षक म्हणून सुरज पुजारी व नवी मुंबई किकबॉक्सिंगचे अध्यक्ष आशिष यांचे मार्गदर्शन लाभले. पदकविजेत्या खेळाडूंचे अभिनंदन केले जात आहे.



# आयपीएल फायनलच्या वेळेत बदल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएलच्या यंदाचा हंगाम शेवटच्या टप्प्यात आहे. गुजरात टायटन्स आणि लखनऊ सुपर जायंट्स या दोन संघांनी याआधीच प्लेऑफमध्ये आपले स्थान निश्चित केले आहे, तर उरलेल्या संघांमध्ये प्लेऑफर्यंत पोहचण्यासाठी चढाओढ रंगली आहे. याच धामधूमीत भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) अंतिम सामन्याची वेळ बदलली आहे.

येत्या २९ मे रोजी आयपीएल क्रिकेटचा अंतिम सामना खेळवला जाणार आहे. याआधी या सामन्याची सुरुवात सायंकाळी ७.३० वाजता होणार होती, तर अर्ध्या तासाआधी म्हणजेच ७ वाजता नाणेफेक होणार होती, मात्र आता बीसीसीआयने या सामन्याची वेळ बदलण्याचा निर्णय घेतला असून सामना ७.३० ऐवजी अर्धा तास उशिराने म्हणजेच ८ वाजता सुरू होईल, तर नाणेफेक तत्पूर्वी ७.३० वाजता केली जाईल.




'क्रिकबझ'ने दिलेल्या माहितीनुसार बीसीसीआयकडून आयपीएलमध्ये समारोप समारंभ आयोजित करण्याचा विचार केला जात आहे. या हंगामात उद्घाटन समारंभाचे आयोजन करता आले नाही, मात्र या वेळी समारोप सोहळा आयोजित केला जाणार आहे. याची सुरुवात ६.३० वाजता सुरू होणार असून तो ५० मिनिटांचा असेल. यानंतर नाणेफेक आणि अंतिम सामन्याला सुरुवात होईल. याच कारणामुळे आयपीएलचा अंतिम सामना अर्धा तास उशिराने सुरू होणार आहे. हा सामना अहमदाबादमधील मोटेरा येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळवला जाणार आहे.

# 'सोनेरी' कामगिरीबद्दल निखतवर अभिनंदनाचा वर्षाव

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताची बॉक्सिंगपटू निखत झरीनने (५२ किलो) इस्तंबुल येथे झालेल्या १२व्या महिला जागतिक अजिंक्यपद बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदकाची कमाई केली. जागतिक स्पर्धेत सोनेरी मोहोर उमटवणारी ती भारताची पाचवी महिला बॉक्सिंगपटू ठरली आहे. याबद्दल देशभरातून तिचे अभिनंदन होत आहे.



निझामाबाद (तेलंगणा) येथे जन्मलेल्या निखतने गुरुवारी झालेल्या ५२ किलो वजनी गटाच्या अंतिम लढतीत थायलंडच्या जितपोंग जुतामासचा ५-० असा धुव्वा उडवला. पाचही पंचांनी अनुक्रमे ३०-२७, २९-२८, २९-२८, ३०-२७, २९-२८ अशा गुणफरकाने निखतच्या बाजूने निकाल दिला. त्यामुळे एमसी मेरी कोम (२००२, २००५, २००६, २००८, २०१० आणि २०१८), सरिता देवी (२००६), जेनी आरएल (२००६) आणि लेखा केसी (२००६) यांच्यानंतर जगज्ञेती म्हणून मिरवण्याचा मान तिने मिळवला.

निखतच्या आधी मनिषा (५७ किलो) आणि परवीन (६३ किलो) यांनी कांस्यपदके पटकावली होती. त्यामुळे ७३ देशांतील ३१० बॉक्सिंगपटूंचा सहभाग असलेल्या यंदाच्या स्पर्धेत भारताला तीन पदके मिळाली. भारताच्या १२पैकी आठ बॉक्सिंगपटूंना (तुर्कीसह संयुक्तरीत्या सर्वाधिक) उपांत्यपूर्व फेरी गाठण्यात यश आले.

# अर्जुनला हंगामातील शेवटच्या सामन्यात संधी मिळणार?

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलचा १५वा मोसम आता जवळपास संपत आलाय. अवघे काही सामने बाकी आहेत. मुंबई इंडियन्स आयपीएलच्या इतिहासातील सर्वांत यशस्वी टीम, मात्र यंदा मुंबईला आपल्या लौकिकाला साजेशी कामगिरी करता आली नाही. मुंबईचे आव्हान केव्हाच संपुष्टात आले. मुंबईचा या मोसमातील शेवटचा सामना शनिवारी (दि. २१) दिल्लीविरुद्ध खेळवण्यात येणार आहे. सचिन तेंडुलकरचा मुलगा अर्जुन तेंडुलकर मुंबई संघात दोन वर्षांपासून आहे, मात्र त्याला अजूनही पदार्पणाची संधी मिळालेली नाही. मुंबईने या मोसमात अनेक युवा खेळाडूंना संधी दिली. आता शेवटच्या सामन्यात जसप्रीत बुमराहच्या जागी अर्जुनला संधी मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे मुंबई इंडियन्सच्या चाहत्यांमध्ये उत्सुकता लागून राहिली आहे.

# रिंकूने सांगितली 'ती' आठवण

**मुंबई : प्रतिनिधी**

कोलकाता नाईट रायडर्स संघाचा खेळाडू रिंकू सिंहने लखनऊ सुपर जायंट्सविरोधात खेळताना १५ चेंडूमध्ये ४० धावा केल्या. या धमाकेदार कामगिरीमुळे त्याचे अभिनंदन केले जात आहे. दरम्यान एकीकडे कौतुकाचा वर्षाव होत असताना रिंकूने त्याच्या खडतर प्रवासाबद्दल सांगितले आहे.

मागील वर्षी विजय हजारे ट्रॉफीमध्ये खेळताना मला दुखापत झाली. त्यामुळे ते वर्ष माझ्यासाठी कठीण ठरले होते. मी पडलो होतो तेव्हा सर्वप्रथम माझ्या मनात आयपीएलचा विचार आला होता. नंतर माझ्यावर शस्त्रक्रिया करावी लागणार असल्याचे तसेच मला सहा ते सात महिने क्रिकेटपासून दूर रहावे लागणार असल्याचेही सांगितले गेले, असे तो म्हणाला.

क्रिकेटपासून दूर गेल्यानंतर वडिलांची काय स्थिती होती याबद्दलही रिंकूने सांगितले. क्रिकेटपासून दूर रहावे लागणार असल्याने मी दु:खी होतो. माझे वडीलदेखील दोन ते तीन दिवस जेवले नव्हते. ही छोटीशी जखम असून हा क्रिकेट खेळाचा एक भाग आहे, असे मी त्यांना सांगितले. मी या काळात दु:खी होतो, परंतु स्वत:वर विश्वास असल्यामुळे मी लवकर बरा झालो, असेही रिंकूने सांगितले.

**फ्रेंचायझीचे आभार**

केकेआर फ्रेंचायझीने त्याच्यावर ठेवलेल्या विश्वासाबद्दलही रिंकूने सांगितले. त्याला २०१८ साली कोलकाता संघाने खरेदी केले होते. तेव्हापासून तो या संघाचा भाग आहे. 'पाच वर्षे माझ्यासाठी खूपच कठीण होती. संघाने माझ्यावर विश्वास ठेवला. फ्रेंचायझीने मला रिटेन केले,' असे म्हणत रिंकूने आभार मानले आहेत.

# युरोपा लीग फुटबॉलचे एनट्रॅक फ्रँकफर्टला जेतेपद

## पेनल्टी शूटआऊटमध्ये रेंजर्सवर मात




**सेव्हिल : वृत्तसंस्था**

नियमित वेळ आणि अतिरिक्त वेळेतील १-१ अशा बरोबरीनंतर पेनल्टी शूटआऊटमध्ये रेंजर्सवर ४-५ अशा फरकाने मात करीत जर्मन संघ एनट्रॅक फ्रँकफर्टने 'युएफा' युरोपा लीग फुटबॉलचे जेतेपद पटकाविले.

स्पेनमधील सेव्हिल येथे झालेला अंतिम सामना सुरुवातीपासून चुरशीचा झाला. पूर्वार्धात दोन्ही संघांच्या बचाव फळींनी चांगला खेळ केला. त्यामुळे मध्यंतराला सामन्यात गोलशून्य बरोबरी होती. उत्तरार्धात फ्रँकफर्टने अधिक आक्रमक खेळ केला, मात्र स्कॉटिश संघ रेंजर्सने प्रतिहल्ला केला आणि ५७व्या मिनिटाला जो अरिबोने केलेल्या गोलमुळे त्यांना १-० अशी आघाडी मिळाली, पण ही आघाडी फार काळ टिकली नाही. ६९व्या मिनिटाला आघाडीपटू राफाएल बोरेने गोल करीत फ्रँकफर्टला बरोबरी साधून दिली. नियमित ९० मिनिटांच्या खेळानंतर ही बरोबरी कायम राहिल्याने ३० मिनिटांचा अतिरिक्त वेळ झाला. त्यातही दोन्ही संघ गोल करण्यात अपयशी ठरले. मग बरोबरीची कोंडी फोडण्यासाठी पेनल्टी शूटआऊटचा अवलंब करण्यात आला.

शूटआऊटमध्ये फ्रँकफर्टने पाचही पेनल्टी अचूक मारल्या. रेंजर्सच्या चार खेळाडूंना चेंडू गोलजाळ्यात मारण्यात यश आले, परंतु अनुभवी मध्यरक्षक आरोन रामसीने मारलेला फटका फ्रँकफर्टचा गोलरक्षक केव्हिन ट्रॅपने अडवला. त्यामुळे फ्रँकफर्टने तब्बल ४२ वर्षांनंतर एखादी युरोपीय स्पर्धा जिंकली. या विजयामुळे फ्रँकफर्टचा संघ पुढील हंगामातील चॅम्पियन्स लीगसाठी पात्र ठरला आहे.

फ्रँकफर्टचा गोलरक्षक ट्रॅपने या सामन्यात उत्कृष्ट खेळ केला. त्याने अतिरिक्त वेळेच्या अखेरच्या काही मिनिटांत आधी रेंजर्सचा आघाडीपटू रायन केंटने मारलेला फटका पायाच्या साहाय्याने अप्रतिमरीत्या अडवला तसेच रेंजर्सचा कर्णधार जेम्स टावेर्निएरने मारलेली फ्री-किकही अडवली.









# आयपीएलमधील सर्वांत यशस्वी तीन संघ यंदा स्पर्धेबाहेर

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये सर्वांत यशस्वी मानले जाणारे चेन्नई सुपर किंग्ज आणि मुंबई इंडियन्स हे दोन्ही संघ यंदा प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडले आहेत. त्याचबरोबर लखनऊ सुपर जायंट्सविरोधात खेळताना पराभव झाल्यामुळे कोलकाता नाईट रायडर्स संघदेखील प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडला आहे. यापूर्वीच्या हंगामांमध्ये तीन संघांपैकी एकतरी संघ प्लेऑफमध्ये राहिलेला आहे, मात्र या वेळी हे तिन्ही संघ प्लेऑफच्या बाहेर असतील. आयपीएलच्या इतिहासात असे कधीही झालेले नाही.










आयपीएलचे यंदाचे पर्व शेवटच्या टप्प्यात आहे. मोजकेच सामने शिल्लक असल्यामुळे सर्वच संघ प्लेऑफपर्यंत पोहचण्यासाठी कसोशीने प्रयत्न करीत आहेत. लखनऊविरुद्धच्या पराभवामुळे कोलकाता संघ प्लेऑफमधून बाहेर पडला आहे.

मुंबई इंडियन्स संघाने आतापर्यंत पाच वेळा जेतेपद पटकावलेले आहे, तर चेन्नई संघाने चार वेळा ट्रॉफी जिंकलेली आहे. कोलकाता या संघानेदेखील दोन वेळा जेतेपद पटकावलेले आहे. हे तिन्ही संघ आतापर्यंत सर्वांत यशस्वी ठरलेले संघ आहेत, मात्र या पर्वामध्ये चित्र काहीसे वेगळे आहे. या वेळी पदार्पणाच्या हंगामातच गुजरात आणि लखनऊ या दोन्ही नव्या संघांनी आपले प्लेऑफमधील स्थान निश्चित केले आहे, तर चेन्नई, मुंबई आणि कोलकाता हे तिन्ही संघ पहिल्यांदाचा प्लेऑफमध्ये नसणार आहेत. यापूर्वी या तीन संघांपैकी एकतरी संघ प्लेऑफमध्ये राहिलेला आहे.

दरम्यान, आपला पहिलाच आयपीएल हंगाम असलेल्या लखनऊ आणि गुजरात या दोन संघांनी सर्वांना आश्चर्यचकित करून टाकणारा खेळ करून दाखवला आहे. गुजरात आणि लखनऊ हे दोन्ही संघ प्लेऑफसाठी पात्र ठरले आहेत.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com